# कृषितीर्थ

■ डिसेंबर २०२० ■ वर्ष २ ■ अंक ९ ■ जळगाव ■ पृष्ठे ५२ ■ मूल्य १० रू

## पृथ्वी सुंदरतेचा होता द्रष्ट्याला ध्यास
## परिश्रमाने रचला कर्तृत्त्वाचा इतिहास

श्रद्धेय भाऊंना विनम्र अभिवादन - दि. १२ डिसेंबर २०२० (८३ वी जयंती)





''शेतीमाल निर्यातीसाठी आवश्यक असणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी करण्याला व्यक्तिगत शेतकऱ्याला मर्यादा असल्यामुळे सरकारने या कामात पुढाकार घेऊन शेतीसाठी वेगळी बंदरे व विमानतळे विकसित केली पाहिजे.''

*– डॉ. भवरलाल जैन*

*(संदर्भ : डॉ. सुधीर भोंगळे यांना १९ डिसेंबर १९९३ रोजी 'दै. सकाळ' साठी दिलेल्या मुलाखतीतून.)*

# जैनहिल्स : यशस्वी पाणलोटातला अद्वितीय नमुना



अशोक जैन
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

## अध्यक्षीय

**‘‘पाण्याची ठेव एका पिढीने सांभाळून, दुसऱ्या पिढीला परत देऊन उतराई झाले पाहिजे. दुसऱ्या पिढीने तिसऱ्या पिढीला दिले पाहिजे. असे पिढ्यान्‌पिढ्या झाले पाहिजे. म्हणजे पर्यावरण समृद्ध होईल. माणूस समृद्ध होईल. माणसाच्या मनात वाईट विचार येणार नाहीत. नदी मनाला खोली देते. वृक्ष मन घट्ट करायला लावतात. पक्ष्यांनी बघून मनाला उभारी वाटते. गायीच्या डोळ्यातली करुणा जगण्याची सुंदर पहाट दाखविते. झाडावर उभारलेली सुंदर फुले पाहिली की संवादाला बहर येतो. हा सुंदर संवाद मनामनांना जोडतो. त्यातून प्रेम, जिव्हाळा, आपुलकी आणि आपलेपणाचे भरजरी वस्त्र विणले जाते. हे वस्त्र बाजारात कुठेही विकत मिळत नाही. या वस्त्रावरचा कशिदा काढण्यासाठी मन तेवढेच तरल, संवेदनशील व भावस्पर्शी लागते. असे मन मोठ्या भाऊंना लाभले हे आम्ही आमचे भाग्य समजतो.’’**

तहान हा सृष्टीचा धर्म आहे आणि ती सृष्टीची धारणा आहे. कुरूक्षेत्र जर देहक्षेत्र मानले, तर देहात जल हवेच. एक वेळ माणूस थोडीशी भूक लांबवू शकेल, पण तहान लांबविणे त्याला असह्य होईल. सृष्टीत जल आहे म्हणून रस आहे. रसरशीतपणा नाहीसा झाला तर कोरड्या विश्वाला कोण विचारणार? पाण्यामध्ये जीव जन्मतो, फुलतो, बहरतो. गवत उगवते ते पाण्याच्या श्वासात. ओलावा असला की, हिरवेपणा हाही सौंदर्याचे बाळसे धरतो. हिरवेपणातला ताजेपणा मनाला तरतरी आणतो. स्वच्छ नदीचा प्रवाह पाहिला की, मनाला जे समाधान व शांती मिळते ती शब्दात सांगता येत नाही. जन्माला पाणी लागते. जन्म संपल्यावरही पाणी लागते. पाणी केवळ स्वच्छता निर्माण करीत नाही. पाण्यातून नवरस निर्माण होतात. माणसाने वस्ती केली ती पाण्याच्या जवळ. पूर्वी नद्यांच्या काठीच आपली गावे वसायची. आता घड्याळाचे काटे उलटे फिरविण्याचे काम आपण चालविले आहे. आता आधी गाव वसवतो. मग कोठून पाणी आणता येईल ते शोधू लागतो. एकेका गावात चारचार–पाचपाच योजना झाल्या तरी हजारो गावांचा टँकर अजूनही बंद झालेला नाही. बाईच्या डोकीवरचा हंडाही उतरलेला नाही.

पडलेल्या पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अन् थेंब ज्या जागेवर तो पडतो तिथेच मुरविला, अडविला आणि साठवला तर बाहेरून कोठूनही पाणी आणण्याची गरज व आवश्यकता पडणार नाही हे आमचे परमपूज्य पिताजी भवरलालजी जैन उर्फ मोठे भाऊ यांनी कृतीतून सिद्ध करुन दाखविले आहे. जळगावच्या जैनहिल्सवर शास्त्रशुद्ध पद्धतीने ‘माथा ते पायथा’ (रिज टू बॉटम) या तत्वावरती पाणलोट क्षेत्र विकासाचा जो कार्यक्रम भाऊंनी राबविला त्यामुळे खडकाळ, मुरमाड मातीमध्ये व डोंगरात कितीतरी टीएमसी पाणी साठू लागले आहे. १९९३ मध्ये जैन हिल्स वरच्या टेकड्या म्हणजे उजाड माळरान होते. कुसळी गवतही उगवत नव्हते. या जमिनीत थेंबभर सुद्धा पाणी मिळणार नाही असे भूजल वैज्ञानिक सांगत होते. पण जिद्द, ध्येय व निर्धार पक्का असला आणि त्याला विज्ञान व तंत्रज्ञानाची साथ असली तर किती आगळावेगळा चमत्कार घडू शकतो हे जैन हिल्सच्या तीन हजार एकर क्षेत्रावरुन आपल्या लक्षात येईल. या परिसराचे भाऊंनी दिवसरात्र मेहनत करुन जे नंदनवन केले आहे ते पाहायला आज देशातूनच काय पण जगातून लोक येतात. जिथे कच्च्या मालाचे उत्पादन होते तिथेच त्यावर प्रक्रिया कारखानदारी उभी करुन स्थानिक मनुष्य तिथल्या तिथे रोजगारात सामावून घेणे आणि पोटाची खळगी भरण्यासाठी तो शहरांकडे जाऊ न देणे हे पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाचे जे अंतिम व मुलभूत उद्दिष्ट होते त्याची पूर्तता जैनहिल्सवर झाल्याचे पाहायला मिळते. म्हणून हा भारतातला अद्वितीय असा यशस्वी पाणलोट आहे. निष्ठापूर्वक केलेले काम किती अप्रतिम आणि लोकोपयोगी होऊ शकते याचा हा उत्तम नमुना आहे. मोठ्या भाऊंच्या जीवनापासून आपण जर काही प्रेरणा घ्यायची असेल तर ती पाण्यासारखीच असली पाहिजे. आपले जीवनही रसाळ, प्रवाही आणि पाणी जसे झाडाच्या मुळापाशी गेल्यावर त्याच्यात मिसळून जाते तसेच आपणही असले पाहिजे. पाण्याची समरसता जगण्याचा महान अर्थ सांगून जाते. आपण जिथे असतो, त्या परिसराशी समरस होणे, हे जगणे असते.

# भवरलाल जैन : द्रष्टा कर्मयोगी




**डॉ. सुधीर भोंगळे**
संपादक

## संपादकीय

**''कर्तृत्वाच्या अहंकाराचे काठिण्य विरघळले व अभिलाषेचा कडवटपणा लोपला, की कर्मपाश तुटतात. फळांची टणक कोय व चोथट साल फेकून दिल्यावर जसा त्याच्या सुमधुरतेचा रसास्वाद अनुभवता येतो, तसेच कर्मातील कर्तृत्वाभिमान व फलासक्ती सोडल्यावर निर्भेळ आनंद अनुभवाला येतो. रसाळ फळाचा आस्वाद घ्यायचा असेल, तर कोय व साल टाकायची - फळ नव्हे! तसेच कर्मातून आनंद अनुभवायचा असेल, तर कर्तृत्वाभिमान व फलाभिलाषा सोडायची- कर्म नव्हे! हाच मोठ्या भाऊंच्या जीवनापासून आपण सर्वांनी बोध घ्यायचा आहे.''**

द्रष्टा आणि कर्मयोगी अशी दोन्ही रूपे एकाच माणसात आढळणे दुर्मिळ असते. द्रष्टा या शब्दाचे दोन अर्थ आहेत. द्रष्टा म्हणजे जीव. जो कर्म करतो तो द्रष्टा. आपण द्रष्टा हा शब्द पुढच्या किंवा भविष्यातल्या गोष्टींचा अचूक वेध, अंदाज घेणारा, व्हीजनरी या अर्थाने वापरतो. कर्माचा जेव्हा विचार येतो तेव्हा जगत निर्माण करुन ईश्वराने मूळ कर्म केले आहे. मूळ कर्मात आपण छोटी छोटी कर्मे करतो. त्या कर्मांचा अभिमान धरतो. त्यापोटी सुखी-दुःखी होतो. दुःख होणे हे मला नकोच आहे. पण सुखी होणे हे सुद्धा दुःखच आहे. दोन्हीही तात्कालिक असते. बदलते असते. सुख काही काळाने संपल्यानंतर दुःख येतेच. सुख दुःखाचा हा लपंडाव भवरलालजी जैन म्हणजे मोठ्या भाऊंच्या आयुष्यात खूप वेळा आला. या अनुभवातून त्यांनी निष्काम सेवेचा मार्ग पत्करला. आपण सेवा करावी, काम करावे पण काही मागू नये. त्यातून चित्त शुद्ध व शांत होते. बुद्धी योग मिळतो.

उद्योजकाला हे कसे शक्य आहे? असा प्रश्न मला नेहमीच पडत असे. म्हणून एकदा धाडस करुन मोठ्या भाऊंना मी सरळच म्हटले, ''तुम्ही दिवसरात्र एवढी मेहनत करुन निरनिराळ्या वस्तुंचे प्रचंड उत्पादन करता. त्या वस्तु गरजूंपर्यंत पोहचविता. नफा-तोट्याचे गणितही मांडता. काही वेळा नफा होतो. बऱ्याचदा तोटाही होतो. तरीही तुम्ही स्थितप्रज्ञासारखे शांत, स्थिर कसे काय राहू शकता?''



तेव्हा भाऊ मला म्हणाले, ''ईश्वर आणि संत हे द्रष्टे आहेत. जीवही द्रष्टा आहे. पण दोघातला द्रष्टेपणा वेगळा आहे. ईश्वर हा अगोदरच ज्ञानरुप असल्यामुळे आणि संत साधनेने ज्ञानरूप झाल्यामुळे त्यांना 'माया' नावाचे तत्त्व छळू शकले नाही. त्यांना अनेक लोकांनी छळले. बहुतेक संतांचे जीवन पाहिले तर ते छळवादाने भरलेले आहे. पण त्याबद्दल एक शब्दही संत साहित्यात कुठेही नाही. त्याबद्दल उल्लेख वा आकस नाही. कारण माया नावाच्या तत्वाला त्यांनी बाधित केलेले असते. या माया तत्त्वावर जर आपण मात करु शकलो तर कर्म आणि



समत्व बुद्धी यांची सांगड घालता येईल. ती घालण्याचा मी प्रयत्न करतो आहे. मला त्यात शंभर टक्के यश आले आहे असा माझा दावा नाही. माझा प्रयत्न मात्र त्या दिशेने निश्चित आहे.''

त्यावेळी भाऊंनी समर्थ रामदासांची दासबोधातली एक ओवी सांगितल्याचे आठवते. ती ओवी अशी होती –

**कर्मयोगे सकळ मिळाली । येकेस्थळी जन्मास आली ।**
**ते तुवा आपुली मानिली । कैसे रे पढत मूर्खा ।।**

कर्मामुळे आपण एका ठिकाणी जन्माला आलो. त्यामुळे शरीराच्या पातळीवर आपण एकमेकांना आपले मानतो. पण त्यांच्या व माझ्यात असलेले हरितत्व एक आहे हे ज्या दिवशी मानू त्या दिवसापासून तो कायमचा आपला होईल. तो शारीरीक पातळीवर कितीही दूर असू दे. मनाने तो सतत आपल्या जवळच असेल. असे आपलेपण निर्माण करणे ज्यांना जमते ती माणसे चिरंतन राहतात.

भाऊंचे हे तत्वज्ञान पुन्हा एकदा आठवायला निमित्त झाले ते त्यांच्या जयंतीचे. १२ डिसेंबर हा त्यांचा जन्मदिवस. आज शरीराने जरी ते आपल्यात नसले तरी आठवणींच्या रूपाने सतत वास करीतच असतात. त्यांची आठवण येत नाही असा एकही दिवस आणि तासही नाही. ते आपल्या कामाकडे बघताहेत आणि प्रश्न विचारण्याच्या तयारीतच आहेत असा भास मलाच काय अनेकांना होतो. एवढेच नव्हे, तर कर्मयोग्याचे हे द्रष्टेपण सतत खुणावत राहते, पुढची मार्गक्रमणा सुकर करते. तो अदृश्य चेहरा वाटाड्या होतो. मग लक्षात येते हा सगळा भाऊंच्याच कर्माचा खेळ आहे.

कर्म हेच त्यांच्या जीवनाचे मुख्य सूत्र होते. कर्मनिष्ठेतूनच जीवन–विकास होत असतो यावर त्यांची श्रद्धा होती. अगदी उपनिषत्कालापासून सर्व विचारवंतांनी ही कर्मनिष्ठा गौरविली




आहे. ईशोपनिषद स्पष्टपणे सांगते, की कर्मे करीतच प्रदीर्घ शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी. योग्य हातवटीने केलेली कर्मे माणसाला बंधनकारक न होता उलट आनंददायीच ठरतात.

**कुर्वन्नेवेह कर्मणि जिजीविषेच्छतं समाः ।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ।।** ईशा.२

ईशावास्यातील हे सूत्र भाऊंच्या जीवनधारणेचा ओजस्वी मंत्र होता. 'जिजीविषेत् शतं समाः, कर्मणि कुर्वन् एव, इतः अन्यथा न अस्ति' व 'कर्म नरे न लिप्यते' हे शब्दसमूह केवळ कर्मयोगाचीच नव्हे तर भाऊंच्या जीवनाची चतुःसूत्री आहे. वरवर पाहणाऱ्यांना ती लक्षात येणार नाही. पण भाऊंच्या जीवनाचा खोलवर व तटस्थपणे अभ्यास करू लागलो तर ही चतुःसूत्री लक्षात आल्याशिवाय राहात नाही. वैदिक तत्वज्ञान किती जिवनाभिमुख आहे, याचे केवळ या एका श्लोकातूनही सम्यक् दर्शन होण्यासारखे आहे. 'जिजीविषेत्' हा शब्द भाऊंना फार आवडत असे. ते नेहमी मला म्हणायचे, या पारदर्शक शब्दातून जीवनाकडे पाहण्याची विधायक दृष्टी मला प्रतीत होते. उत्साहाने व आनंदाने शंभर वर्षे जगण्याची जिजीविषा असणे ही आपल्या तत्वज्ञानाची जीवनधारा आहे. हा निरामय दृष्टीकोन साऱ्या विफलतावादाला व पलायनवादाला मुळातच निपटून टाकतो. जीवन ही आपल्याला मिळालेली शिक्षा आहे, असे मानीत त्यातून सुटका करुन घेण्याची नेभळट विवंचना करीत न बसता उलट या सुवर्णसंधीचा सदुपयोग करुन घेणे हाच पुरुषार्थ भाऊंनी आयुष्यभर मानला व या सूत्राधारेच शेवटच्या श्वासापर्यंत ते काम करीत राहिले. प्रक्रिया केलेल्या पांढऱ्या कांद्याची परदेशात विक्री, आंध्रातील मार्बल खाणींमध्ये नक्षलवाद्यांकडून होणारा त्रास, दुष्काळाने फळबागा जळणे, सूक्ष्मसिंचनाचे अनुदान लवकर न मिळणे अशा अनेक समस्या व प्रश्नांचा ते रोज सामना करीत राहिले. पण या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी भाऊंनी कधी लाचारी पत्करली नाही आणि आपल्या विचारांना व ध्येयवादाला मूठमातीही दिली नाही. संकटांशी झुंज दिली. हे झुंजलेपण आता त्यांच्या मुलांमध्येही उतरलेले दिसते आहे. त्यामुळे कंपनीला अनंत अडचणी येऊनही सहकाऱ्यांशी संवाद करीत व त्यांना विश्वासात घेत संकटातून बाहेर पडण्याचा जो प्रयत्न त्यांनी चालविलेला आहे तो निश्चितच स्तुत्य आणि अभिनंदनीय अशा प्रकारचा आहे.

दीनवाणे न होता (अदीना : स्याम), लाचारीने दास्य न स्वीकारता (अजिता : स्याम) आनंदाने शंभर वर्षे जगण्याची (मोदाम शरदः शतम्) गुरुकिल्ली म्हणजेच कर्मयोग. जीवन नीरस व्हावयास नको असेल, तर 'कर्मणि कुर्वन् एव' याशिवाय दुसरा राजमार्ग नाही. 'इतः अन्यथा न अस्ति', कर्म आचरण्याशिवाय दुसरा मार्ग नाही, म्हणून असहायता नको. कर्म आपल्यावर कुणी लादलेले नसून आपणच ते उत्साहाने करणार आहोत. म्हणूनच भाऊ नेहमी म्हणायचे 'आपणच आपल्या कामाचे मालक आहोत.' कर्म आपल्याला फरफटत नेणार आहे, ही

मूलभूत विचारधारा 'नर' या एकाच शब्दातून ठसविण्यात आली आहे. हे आपले नरत्व उमजल्यावर आपल्या पायांत कर्माची बेडी अडकण्याची शक्यताच उरत नाही; उलट कर्माचा लगाम आपल्या हाती येतो. या कर्माच्या घोड्यावर स्वार होऊन आपण जीवनपथ आक्रमावयाचा आहे. हे भाऊ सकाळी पहाटे पाच वाजता फिरायला निघाल्यापासून लक्ष्मण ते ढाके या सर्वांना सांगत. त्यांच्या डोक्यात हे तत्वज्ञान किती शिरत असेल हा भाग निराळा आहे. पण भाऊंच्या कामाला व वैचारिक बैठकीला या तत्वज्ञानाची पक्की बैठक होती हे मात्र निश्चित. ही बैठक भाऊ आपल्या सहकाऱ्यांना साध्या साध्या गोष्टी व उदाहरणांमधून उकलून दाखवीत असत. साधं, सोपं, सरळ लिहिणे आणि बोलणं यावर त्यांचा कटाक्ष असल्यामुळे तत्वज्ञानातला कितीही अवघड विषय असो ते निरनिराळे शब्दकोश व डिक्शनरीतून साधे, सोपे समजण्याजोगे पर्यायी शब्द शोधूनच काढीत.

एके दिवशी 'नर' या शब्दात दुसरीही कशी एक मेख आहे ती त्यांनी मला समजून सांगितली. क्षुद्र आकर्षणात रममाण होत नाही. 'न रमते' – तो नर, हे मार्मिकपणे दर्शविण्यासाठी 'न कर्म लिप्यते नरे' असा अर्थगर्भित शब्दप्रयोग करण्यात आल्याचे भाऊंनी जेव्हा सांगितले तेव्हा संस्कृततज्ज्ञ असलेल्या डॉ. माधवराव चितळे यांनी हासून भाऊंच्या हातावर टाळी देवून तुम्ही हे संस्कृत कुठे शिकलात? हा प्रश्न मोठ्या कुतूहलाने विचारला. यातच भाऊंच्या बारकाव्याने केलेल्या अभ्यासाचे सार आहे. आपण भोगांचे दास नसून भोगांचे स्वामी आहोत, हे आपले नरत्व उमजणाऱ्याला कर्म जखडू शकत नाही, हे सत्यच भाऊंनी या शब्दांतून गुंफून आमच्यापुढे ठेवले. मला तर नेहमी असे वाटते 'जिजीविषेत् शतं समाः' या सूत्रातून वैफल्यग्रस्त पलायनवादाला आणि 'न कर्म लिप्यते नरे' या सूत्रातून भाऊंनी भोगवादाला मूठमाती दिली. कर्मफलाच्या अभिलाषेत न गुरफटता जीवन–विकासासाठी उत्साहाने कर्म करण्याची हातवटी साधणे हाच कर्मयोग गीतेलाही अभिप्रेत होता. तोच भाऊंनाही हवा होता. म्हणून कर्म करण्याहून जीवन–विकासाला दुसरा पर्यायच नाही. कर्म नाही केले तर जगणेच अशक्य होईल असे ते सतत म्हणत



राहिले. नुसते म्हणून थांबले नाहीत. स्वतः पहाटे पाचला उठून घराबाहेर पडत. जैनहिल्सवरच्या निरनिराळ्या कामांची पाहणी करीत काम करणाऱ्यांना दिवसभराच्या कामाच्या पूर्ण सूचना देत देत झाडे, पिके यांच्याशी संवाद करीत. त्यांचे बारकाईने निरीक्षण करीत. या संवादातून जे त्यांना समजे त्याबद्दल ते संबंधितांना कळवून तातडीने कमी-जास्त जे काही असेल त्याची पूर्तता करायला भाग पाडीत.




वनस्पती आणि पिकांशी त्यांचा जो नित्य संवाद चाले तो अनोखा, कुतूहल वाटावा असा व आश्चर्यचकित करणारा होता. हे संवादाचे शास्त्र ते कसे आणि कुठे शिकले याचे उत्तर मात्र अखेरपर्यंत अनुत्तरीतच राहिले. कदाचित रोज झाडांना, आम्रवृक्षाला भेटत राहिल्यामुळे त्यांच्यामध्ये जीवाभावाचे नाते निर्माण झाले असेल आणि त्यातून हा संवाद वाढीला लागला असेल अशी आपली भोळीभाबडी समजूत करुन घेऊन मी स्वतःच्याच मनाची समजूत घातली. पण आज राहून राहून वाटते हा संवादाचा प्रश्न आपण भाऊंना विचारायलाच हवा होता. कारण त्यांच्यासारखा मोठा संवादकर्ता शतकातून एखादाच जन्माला येतो. भाषणे आणि पोपटपंची करणारे ढीगाने आहेत. पण समोरच्याच्या मनातले ओळखून हळूवार लाघवी शब्दांत, आपला प्रेमपान्हा ओतीत स्वतःचे म्हणणे पटवून देत ते समोरच्याच्या गळी उतरविणारे फार थोडे असतात. त्यातले एक भाऊ होते. संवादाचे महत्व त्यांनी अचूक व पुरेपूर जाणले होते. संवादातून आपण आपल्याला उकलत जातो. आपले उकलणे हे एका अर्थाने उमलणे असते.बोलण्यातून अधिक उमलतो. त्यांना संत ज्ञानदेव 'संतांची संगत' असे म्हणतात तर स्वामी विवेकानंद 'गुरुशिष्यांचा बोधभावी संवाद' असे म्हणतात. संवादातून आपण कुठवर चालू शकतो ते आपल्याला समजते. वाटचालीत अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात. यातून द्रष्टेपण प्राप्त होते. द्रष्टा घडतो. भाऊंमधील द्रष्टेपणाची जडणघडण अशीच झाली असेल का? असा विचार जेव्हा मनात येतो तेव्हा त्याचे उत्तर मी भाऊंनी लिहिलेल्या पुस्तके आणि केलेल्या भाषणांमध्ये शोधू लागतो. कधी कधी याचे उत्तर मी ज्ञानदेवांच्या 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभवातून'ही शोधायचा प्रयत्न करतो. या संदर्भात ज्ञानदेवांनी मनोज्ञ प्रश्न विचारला आहे. तो म्हणजे ज्याने दिवा लावला त्याची सिद्धी दिव्याने केली की लावणाऱ्याने दिव्याची सिद्धी केली? तसे दृश्याने द्रष्ट्याकडे द्रष्टेपण येत असले तरी दृश्याची सिद्धी द्रष्टानेच केली असे होते. आत्मा स्वयंप्रकाशित असून त्याने अनेक नामरूपात्मक जगाला प्रकाशित केले आहे. तो दृश्य आणि द्रष्टा यांच्या अतित आहे. ज्ञानोबाराय अमृतानुभवातील पुढील ओवीत याचे योग्य वर्णन करतात -

**तैसे दृश्य का द्रष्टा ? या दोन्ही दशा वांझटा ।**
**पाहता एकी काष्ठा । स्फूर्तिमात्र तो ।।**

या साऱ्यातून घ्यावयाचा मूलभूत विचार असा आहे की आपण कितीही विचारांची पराकाष्ठा केली तरी एक स्फूर्तिमात्र आत्माच आहे आणि तो जैनहिल्सवर भाऊंच्या रूपातून वावरतो आहे. म्हणून समाधीवर जाऊन त्यांचे दर्शन घ्यायचे असते. त्यामुळे भेदात्मक सृष्टी नाहीशी होते. विचारांचा गोंधळ व चलबिचल संपुष्टात येते. अभेदात्मक ईश्वरतत्वाचा प्रत्यय येतो. आत्मभावाला चिरंजीव उधाण येते. दृश्य व द्रष्टा यांच्या ऐक्याचे भाऊंमधील स्वरूप व मिलन विलक्षण होते.

लाटा पाण्यात घातल्या. सोन्याचे सोने पांघरले. गुळ गुळाने माखला. अग्नी ज्वालांनी उधळला. याने काहीही फरक पडत नाही. तसे नित्य स्फुरदरूप असल्याने दृश्याच्या मिषाने आपल्याला पाहणे हे न पाहण्यासारखेच आहे. कारण अनेक दृश्यभावांचा विषय झाला आणि तो निर्गुणरूपाने राहिला तरी त्याचा एकपणा कमी होत नाही. तो तोच राहतो. तो आनंदाला पारखा होत नाही. एकूणच नामरूपात्मक जगात चैतन्याच्या भेदशून्य स्थितीला काहीही उणेपणा नाही. यालाच 'अनुपम्यचिद्विलास' म्हणतात. ज्या ज्ञानाच्या युगाने सर्व जग प्रकाशले आहे ते ज्ञान आम्हाला हवे आहे. ही ज्ञानलालसा भाऊंच्या जीवनात किती खचाखच भरलेली होती हे मी तुम्हाला सांगायलाच पाहिजे असे नाही. आपल्या सर्वांना ती विदीत आहे.

संवाद, ज्ञाननिष्ठा आणि कर्म या त्रिमूर्तींची भाऊंच्या जीवनात जी पक्की गाठ बसली तिने द्रष्टेपणाला वेगळीच झळाळी आली. जैन कंपनीच्या मालाने जगाची बाजारपेठ पाहिली. बघता बघता परदेशातही कंपन्या उभ्या राहिल्या. जळगावात बसून त्या चालविल्या जाऊ लागल्या. जगभरचे ज्ञान व तंत्रज्ञान जळगावात गोळा झाले. ज्ञानाने मन तृप्त झाले. शुद्ध भक्ती फुलली. सहज वागणे ही समाधी झाली. भक्तीतला विवेक जागा झाला. जगण्याचा परम भावार्थ उमजला. ज्ञान हे अनुभूतीचे शास्त्र आहे याचा प्रत्यय आला. द्रष्ट्याच्या दृष्टीला असंख्य धुमारे फुटले. केवळ ऐहिक सुखात माणसाची तृप्ती नाही. विवेकनिष्ठ जीवन पद्धतीचा अंगिकार आवश्यक झाला. त्यातून जीवनाला व कर्माला आकार येऊन एक शिस्तबद्ध चौकट तयार झाली. सगळ्यांचा विकास व्हावा आणि ज्ञानाची कवाडे सगळ्यांसाठी मोकळी असावीत या धारणेतून कंपनीतील सहकाऱ्यांचे देश-परदेशात प्रशिक्षण सुरु झाले. विश्वास व आपुलकीचा प्रेम झरा अखंड वाहू लागला. प्रत्येकाला कंपनी आपली आहे आणि आपणच तिचे मालक आहोत असे मनोमन वाटू लागले. मागच्या एक-दीड वर्षात कंपनी मोठ्या आर्थिक अडचणीत आली. कित्येकांना वर्षभर पगारही मिळाला नाही तरी देखील भाऊंच्या विचारांचे बाळकडू पिऊन तयार झालेली सहकाऱ्यांची पिढी तसूभरही ढळली नाही. तिची कंपनीवरची श्रद्धा कमी झाली नाही. उठवळ, संधीसाधू आणि फायदेमंगू हवेतल्या पक्ष्यासारखे भुर्रकन उडून गेले. पण निष्ठावंतांची जी बलवान जोमदार फळी भाऊंनी घामाचे रक्त ओतून तयार केली होती ती अभंग राहिली. तसूभरही ढळली नाही. हे पत्थराचे अभंग चिरे ज्यांनी पायात बसविले ते भाऊ किती द्रष्टे होते याची साक्ष शतकानुशतके आपल्याला मिळत राहिल. आजारपणाने भाऊंचा कायम पाठलाग केला. पण ते तसूभरही खचले नाहीत आणि मूळ ध्येयापासून यत्किंचीतही ढळले नाहीत.




मन आणि प्रकृतीच्या चिंतनातून निर्माण झालेली निर्भरशील जाणीव हा अभ्यासयोग ठरला. चिंतनाने मात्र भाऊंना अखेरपर्यंत साथ दिली. त्यामुळे चिंतनातून जाणीवा निर्मळ झाल्या. दृष्टीला प्रकाश लाभला. त्यांच्या नव्या विचारांना चालना मिळाली. निरीक्षणांना भक्कम आधार लाभला. परीक्षणांच्या खोल्या सकस बनल्या. वृत्तीतली उत्कटता विवेकगर्भ बनली. दृष्टीतली आपुलकी सोहळा झाली. अंतर्मनात दिवा पेटला. त्याच्या शांत प्रकाशात वृत्ती विनम्र झाल्या. मनाचे आकाश अथांग झाले. शब्दांना रसत्व आले. विवेचनाला माधुर्य आले. जगण्याला उत्साह मिळाला. या साऱ्यांनी मिळून अभ्यासू मनाला सभ्यता लाभली. ती निर्भयशील झाली. लोकांच्या रक्षणाला ती उपयोगी पडली. पुस्तकी ज्ञानापेक्षा आत्मानुभवी ज्ञान अधिक गौरवशाली ठरले. माणसाला नीट वाचण्याची उपासना करता करता 'स्व'तून जो अनेकांचा विचार करतो तोच मुक्त व द्रष्टा होतो. द्रष्टा हा रूपाने नेहमी परमात्मा असतो. आपले मोठे भाऊ म्हणजे भवरलालजी जैन अगदी तसे होते. जयंतीच्या निमित्ताने ही शब्दफुलांची ओंजळ अत्यंत विनम्रभावे त्यांच्या चरणी अर्पण करुन थांबतो.

# भाऊंचे निरंतर चिंतन



# शेतकरी कल्याणाचे

डॉ. दि. मा.मोरे

**विचाराचे कृतीत रुपांतर करण्याची क्षमता असणाऱ्या भाऊंनी कायमच शेतकऱ्यांच्या जीवनाला कलाटणी कशी मिळेल आणि देशाच्या आर्थिक विकासाला हातभार कसा लागेल अशाच पद्धतीने विचार केला. अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन असणाऱ्या भाऊंच्या विचारांना कार्यकर्तृत्वाची जबरदस्त धार होती. जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या काही विचारांचा घेतलेला हा धांडोळा.**

कै. भवरलालजी जैन यांना मोठे भाऊ म्हणून संबोधले जात असे. १९९६ पासून त्यांचा मला सहवास लाभला. काही माणसे विचाराने उंच असतात, पण त्यांच्या हातून कृती काही घडत नाही. काही माणसे कृतीने उंच असतात पण अबोल असतात. भाऊंजवळ हे दोन्ही गुण होते. विचाराचे कृतीत रुपांतर करण्याची त्यांची क्षमता होती. तयारी केल्याशिवाय ते कोठेही व्याख्यान देत नसत. ते फर्डे वक्ते नव्हते हे जरी खरे असले तरी त्यांच्या बोलण्यामध्ये सर्वसामान्य जनतेचे भले, शेतकऱ्यांचे भले आणि पर्यायाने देशाचे भले हा भाव मध्यवर्ती असायचा. २५ नोव्हेंबर २००६ रोजी यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई येथे भाऊंच्या गौरवार्थ त्यांच्यासाठी पारितोषिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अनेक मान्यवर या समारंभाला उपस्थित राहाणार होते. या सोहळ्यात भाऊंना आपले विचार मांडावयाचे होते. माझ्या डिसेंबर २००५ नंतरच्या निवृत्ती कालावधीत सुरुवातीची दोन तीन वर्षे भाऊंशी माझा जास्त संपर्क आला. भाषणामध्ये नेमके काय मांडायचे याविषयी ते चिंतन करत असत आणि अनेकांबरोबर चर्चा करत असत. साधारणतः याच कालावधीत कोकण कृषी विद्यापिठातर्फे त्यांना डॉक्टरेट ही मानद पदवी बहाल करण्यात आलेली होती. विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात तरुण कृषी वैज्ञानिकांना त्यांना संबोधित करावयाचे होते. या दोन्ही प्रसंगी त्यांच्याशी संवाद करण्याची संधी मला मिळाली होती. त्यातून मला खूप काही मिळत होते याचा मला आनंद होत असे. दिनांक १३.८.२००९ ला साम टिव्हीने दूरदर्शनवर त्यांची प्रदीर्घ मुलाखत घेतली होती. या तिन्ही ठिकाणी त्यांनी मांडलेले विचार शेतकऱ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे होते आणि देशाच्या आर्थिक विकासामध्ये भर घालणारे होते, याचा मला सातत्याने प्रत्यय येत होता.

दिनांक २७ व २८ नोव्हेंबर २००६ ला जैन हिल्स जळगाव येथे जैन उद्योग समुहाशी जोडले गेलेल्या वितरकांच्या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २८ रोजी परिषदेचा समारोप करताना भाऊंनी शेकडोच्या संख्येने उपस्थित असलेल्या वितरकांपुढे आणि या निमित्ताने एकत्रित आलेल्या कंपनीच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांपुढे जे विचार मांडले ते आजसुध्दा माझ्या कानामध्ये घुमत असतात. या परिषदेमध्ये उपस्थित राहून माझ्या कानावर जे पडत होते त्यातील मला भावणाऱ्या विचारांचे टाचण केलेली दोन तीन पाने सहजपणे माझ्याजवळील जुने कागद चाळत असताना माझ्या हाती पडले. मला खूप आनंद झाला. मुद्यांचे टाचण करण्याची माझी सवय फार जुनी आहे. महाविद्यालयात असताना प्राध्यापकांच्या तोंडच्या शब्दाची नोंद माझ्याकडे उपलब्ध असे आणि त्याचाच वापर करुन




**कोकण कृषी विद्यापीठातर्फे भवरलालजी जैन यांना सन्माननीय डॉक्टरेट पदवी प्रदान करताना कुलगुरू डॉ. शंकरराव मगर.**



परिक्षेची तयारी करणे मला सोपे जात असे. कदाचित प्राध्यापकांच्या भाषेमध्ये उत्तर पत्रिकेमध्ये प्रश्न सोडवल्यामुळे मला इतरांच्या तुलनेत जास्त गुण मिळत असावेत, असे मला अनेकवेळा वाटून जात असे. अनेकवेळा वर्गामध्ये माझ्या उत्तरपत्रिकेचा प्राध्यापक मंडळी आवर्जून उल्लेख करत असत. त्याचे इंगित माझ्याजवळ असलेल्या वहीतील टाचणामध्ये असे. व्याख्यानाला उपस्थित राहून इतरांचे चांगले विचार ऐकण्याचा मला छंद आहे. आजसुध्दा आधाश्याप्रमाणे मी चांगल्या व्याख्यानाला हजेरी लावतो. हातात लहानशी, खिशात मावणारी डायरी घेऊन टाचण घेत असतो. गेल्या तीस चाळीस वर्षातील टाचणाने भरलेल्या अनेक डायऱ्या व वह्या माझ्याकडे जतन करुन ठेवलेल्या आहेत. वर्तमानपत्र व लेखातील चांगल्या विचाराची कात्रणे जपून ठेवण्याची मला आवड आहे. अनेक वेळा, इतरांच्या दृष्टीने रद्दी असलेला हा भार नीट जपून ठेवणे त्रासदायक होते. पण काय करणार? म्हणतात ना, माणूस सवयीचा गुलाम असतो, असेच काही.

गेल्या एक महिन्याभरापासून माझे स्नेही डॉ. सुधीर भोंगळे, भाऊंच्या पुण्यतिथी निमित्त आठवणीला उजाळा देणारे टिपण मी द्यावे याचा पाठपुरावा करत होते. दिनांक २५ फेब्रुवारी २०१६ ला भाऊंनी या जगाचा निरोप घेतला. शून्यापासून सुरुवात करुन त्यांनी डोंगराएवढे काम इतरांपुढे उभे केलेले आहे. हाती असलेल्या महाराष्ट्र वितरक परिषदेच्या टाचणाचा उपयोग करुन भाऊंच्या आठवणीला उजाळा देण्याचा अल्पसा प्रयत्न मी या छोटेखानी लेखामध्ये करणार आहे.

भाऊंनी जैन उद्योग समुहाच्या आर्थिक स्थितीबद्दल उपस्थितांना आवगत केले. 'कंपनीची आर्थिक स्थिती सुधारली आहे आणि वार्षिक उलाढाल रुपये एक हजार कोटी पर्यंत गेलेली आहे. २००६-०७ ला रुपये दीड हजार कोटी पर्यंत जाईल व येत्या दोन तीन वर्षात रुपये तीन हजार कोटीपर्यंत जाईल', असे भाऊ म्हणाले. भाऊंचे हे भाकित खरे ठरले आहे आणि कंपनीची आजची (२०१७-१८) उलाढाल रुपये दहा हजार कोटी पर्यंत गेली असल्याचे समजते. ते पुढे म्हणाले, 'कंपनीकडे अडीच हजार एकर स्वतःची जमीन आहे. लीज वर घेतलेल्या जमीनीसह कंपनीकडे पाच हजार एकर जमीन आहे.शंभर कोटी रुपयाची मशिनरी आहे आणि १५ लक्ष चौ.फूटाचे बांधकाम

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार भवरलालजी जैन यांना प्रदान करताना कवी ना. धों. महानोर आणि कार्याध्यक्ष अरुण गुजराथी**





जळगावच्या जैन हिल्सवर उभारलेले विविध प्रक्रिया उद्योग आणि तलाव व बंधाऱ्यांमार्फत केलेला पाणीसाठा.



आहे इ. कंपनीच्या डीलरची आर्थिक स्थिती सुधारली आहे. कंपनीची निर्यात जवळपास रुपये साडेतीनशे कोटीची म्हणजे तीस टक्के आहे. ठिबकच्या संचाची विक्री रुपये तीनशे कोटीची आहे. यापैकी ३५ टक्के महाराष्ट्रात आहे व उर्वरित बाहेरच्या राज्यात आहे. डीलरला ९ टक्के कमिशन मिळते आणि त्यात वाढ करण्याची त्यांची मागणी आहे'.

'शेतकरी सुधारला नाही. त्याला १५ ऑगस्ट (स्वातंत्र्याची फळे) पहावयास मिळाली नाही. हे जास्त दिवस चालणार नाही. शेतकऱ्यावरच आपले सर्व अवलंबून आहे. शेतकरी जास्त काळ दरिद्री राहिला तर आपणास पण सुखशांती लाभणार नाही. पाईप विकले, ड्रीप विकले. कंपनीला व डीलरला पैसा मिळाला. शेतकरी गरीबच राहिला आणि म्हणून याचे उत्तर शोधले पाहिजे. पैसे जास्त मिळाले की, व्यसनाधिनता, चैन करणे, बंगले बांधणे, लग्नात जास्त खर्च करणे, शेती खरेदी करणे इ वैगुण्ये माणसाला चिकटतात. तो माणुसकी विसरतो, निती विसरतो व बेफाम वागतो. पुढे चालून नातीगोती विसरतो. पत्नी, मुलगा, आई वडील, मित्र हे त्याला नकोसे होतात. त्याचे एक वेगळे विश्व तयार होते. असे तुमचे होऊ देऊ नका. यावर उपाय आहेत. कमावलेला पैसा गुंतवून व्यवसायात वाढ करा. सतत कामात राहा आणि वाईट विचार करण्यास मनाला वेळ देऊ नका. सतत काम, काम हाच मंत्र जपा'.

'शेतीच्या क्षेत्रात, शेतकऱ्याला त्याच्या पिकाला जास्त भाव पाहिजे, विक्रेत्याला (वितरक/डीलर) जास्त कमिशन पाहिजे आणि कंपनीला जास्त नफा पाहिजे या तीन मागण्या पुढे येत आहेत. सध्याच्या खाजगीकरणाच्या, उदारीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात हे शक्य आहे का? हे काहीही शक्य नाही, तरी सर्वांना श्रीमंत व्हावयाचे आहे. हे कसे घडेल? हे स्पर्धेचे युग आहे. अनेक लोक या व्यवसायात उतरले आहेत. त्यामुळे वस्तुचे भाव वाढणार नाहीत. तुमचाच शेजारी (परराज्य, परदेश) कमी

पीपीटी मॉडेलवर जळगावातील गिरणा नदीवर जैन कंपनीने उभा केलेला कांताई बंधारा.



किंमतीत पाहिजे त्या वस्तू उपलब्ध करुन देईल. पुढील गोष्टी घडू शकतील'.

'शेतकऱ्याने उत्पादकता वाढवावी. उत्पादन वाढेल व भावात वाढ न होता उत्पन्न वाढेल. म्हणून शेतकऱ्यांना अधिक उत्पादनासाठी घडविले पाहिजे. त्याचे प्रबोधन करुन शेतीतील नवीन तंत्रज्ञानाची, अवजाराची माहिती करुन दिली पाहिजे. चांगल्या गुणवत्तेचे अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्याला शास्त्रीय शेती करण्यास शिकविले पाहिजे. विक्रेत्याने त्यांचे उत्पन्न आधिक विक्री करुन वाढविले पाहिजे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले म्हणजे वस्तुंची विक्री वाढते व विक्रेत्याचे उत्पन्न आपोआप वाढते. कंपनीलापण हेच तत्व लागू आहे. जास्त नफा मिळविण्यासाठी वस्तुचे जास्त उत्पादन केले पाहिजे. सध्याच्या उदारीकरणाच्या युगात अधिक उत्पादन हा मंत्र जपावयास पाहिजे. याकडे लक्ष न देता, पिकाला अधिक भाव, विक्रेत्याला अधिक कमिशन व कंपनीला अधिक नफा या बाबी निरर्थक ठरणार आहेत'.

'शेतकऱ्याचा विकास म्हणजे ग्रामीण विकास या विचारावर दृढ विश्वास असावयास पाहिजे. यासाठी तीन गोष्टी करावयाच्या आहेत. सेंद्रीय खतावर पिकलेल्या मालाला किमान दीडपट भाव मिळणार आहे. जमीन सुपीक राहाणार आहे. खेड्यामध्ये जनावरांची संख्या कमी झालेली आहे म्हणून हे खत मिळणे दुर्मिळ झाले आहे. सेंद्रीय खताची निर्मिती करण्याची गरज आहे आणि हे खत बाजारात आणून किफायतशीर दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे. विक्रेत्यांनी यासाठी तयारी दाखविण्याची गरज आहे. गोबर गॅसचा प्रयोग फसला. शेण मिळत नाही, पाणी नाही व गोबर गॅस सयंत्र हिवाळ्यात चालत नाही. देशभर हा प्रयोग फसलेला आहे. पाटबंधारे खात्यात लाभक्षेत्र विकासाचा प्रयोग फसला. तसाच गोबर गॅसचा प्रयोगपण फसलेला आहे. आता स्टार्च, उष्टे अन्न, ज्वारीचे थोडे पीठ याद्वारे माफक श्रमांत चार पाच माणसाच्या कुटुंबाला पुरेल येवढा बायो गॅस प्लँट घरोघरी उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे. सर्व लहान मोठ्या नदी नाल्यावर बंधारे बांधले पाहिजेत.मृद व जलसंधारणाचे म्हणजेच पाणलोट क्षेत्र विकासाचे काम शासन करत आहे. खाजगी क्षेत्रातून बंधारे बांधून जलसंधारणाची कामे करावयास पाहिजेत, तेव्हांच ग्रामीण भाग सुधारेल. यासाठी आपण सर्वजण झटू या आणि ग्राम विकास करु या'.

भाऊ सहजपणे बोलत असताना, फार मोलाचा विचार देत असत. एकदा ते म्हणाले, 'अप्पासाहेब पटवर्धन, विनोबा भावे,

साने गुरुजी, बाबा आमटे या समर्पित भावनेने समाजाची सेवा करणाऱ्या थोर लोकांचा संपर्क आला नाही. मी बालवाडीतील विद्यार्थी आहे. या सर्वांचे दर्शन मला पुस्तकातूनच झाले आहे. सामाजिक बांधिलकी, सामाजिक कल्याण या विचारांचा या थोर लोकांवर जबरदस्त पगडा होता. चांगले विचार, संस्कार हे भांडवल आहे. संस्काराला काही खर्च करावा लागत नाही. ते मोफतच होते. प्रामाणिकपणे काम करणे याच तत्वाला घट्ट धरुन पुढे जावयाचे होते. व्यवसायात प्रामाणिकपणाने काम करता येईल का हा प्रश्न पडत असे. निराशा पदरी पडली नाही. अवास्तव अपेक्षा नव्हतीच. चांगले जीवन जगण्याचे समाधान मिळाले. चांगली माणसे जोडली'. भाऊंच्या जगण्याचे सार यातच दिसून येते.

अनेकवेळा चिंतकाच्या भूमिकेत जाऊन देशातील जडणघडणीबद्दल आत्मपरीक्षण करत असत. २००८-०९ मध्ये मुलाखतीच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केलेल्या विचाराचे टिपण माझ्या संग्रहात हाती लागले. एक तपाचा काळ लोटला आहे. शेतीतील उत्पादन वाढले आहे. अन्नधान्याचे उत्पादन एकाच वर्षात ३०० द.ल. टनाचा आकडा ओलांडत आहे. शेतकऱ्यांची स्थिती मात्र घसरलेलीच दिसते. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा आशय या ठिकाणी देण्याचा मोह मला आवरत नाही.



गेल्या ६२-६३ वर्षांमध्ये देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती, आपण स्वातंत्र्योत्तर काळात काय बघतो आहोत – आणि स्वातंत्र्यापूर्वी ती कशी असावी याबद्दल आपली स्वप्नं काय होती, हे आपल्यासमोर आहे. हे स्पष्टपणे मांडावे लागेल की, गांधीजींना जो समाज, जी आर्थिक व्यवस्था आणि जी सांस्कृतिक स्थिती अभिप्रेत होती, ती मात्र आपण साध्य करू शकलेलो नाही. राष्ट्रपित्याला जे अभिप्रेत होतं ते आपण करू शकलो नाही. त्यापेक्षा


भारतात अन्नधान्यातली दुसरी हरितक्रांती गव्हाच्या पिकामुळेच यशस्वी झाली आहे.

काही वेगळंच आपण साधलं आहे. सगळंच गमावलं आहे असं मी म्हणणार नाही. पण वेगळं साधलं एवढं मात्र म्हणावं लागेल. आपण काय साधलं आहे तर, उद्योगांची मुहूर्तमेढ करून आपण भारताला बलशाली करायच्या मार्गावर लावलं. एवढंच नव्हे, तर महासत्ता होण्याच्याही आपण मार्गावर आहोत. इथपर्यंतही म्हणण्यास काही हरकत नाही. वस्तुत: उद्योग म्हटला म्हणजे आपण जरी काहीही करायचं ठरवलं तरी त्याची शेवटी जी होते ती दशा किंवा दिशा. दिशा आपण कोणतीही घेतली तरी त्याची आत्ताची जी दशा व्हायची तीच होते असा एकूण आत्तापर्यंतचा आपला अनुभव आहे. आपण समाजवादाने सुरुवात केली आणि



सार्वजनिक उद्योगांना महत्त्वाचे स्थान असायला पाहिजे असे आपण ठरवले. परंतु शेवटी झाले असे की, आज तर सर्व सार्वजनिक उद्योग मागे पडायला लागलेत, ते अगदी तोट्याने ग्रस्त झाले आहेत, ते आपण केव्हा एकदा विकून टाकू. आणि त्यांचे खाजगीकरण करून टाकू, जागतिकीकरण करून टाकू अशी आपल्याला जणू घाई झाली आहे! एवढेच नव्हे, तर आपल्याला सर्वच गोष्टींची घाई झाली आहे असे वाटायला लागले आहे. म्हणजे आता आपल्याला विकास हा ताबडतोब साधता आला पाहिजे. आपल्याला केवळ आर्थिक विकासच नव्हे, तर सर्व गोष्टींमध्ये आपली घोडदौड झाली पाहिजे असे आपण गृहीत धरुन वागायला सुरुवात केली आहे आणि तसं केवळ वागायला सुरुवात केली आहे असे नाही, तर त्याचा प्रचार, प्रसारही आपण करतो आहोत. नेमकं .. काय घडतं आहे की, एकीकडे आपली औद्योगिक प्रगती खूप झपाट्याने झाली, आपण चांगला पाया निर्माण केला, त्यावर काही दिवसांसाठी का असेना, इतक्या वर्षांसाठी का असेना, आपण धनधान्याच्या दृष्टीने स्वावलंबी झालो. या काळामध्ये सर्व काळ दुष्काळाला आपल्याला सामोरे जावे लागले असे झाले नाही. ज्या गोष्टी झाल्या नाहीत, त्याची चर्चा करणे जास्त योग्य आहे असे मला वाटते. कारण ज्या गोष्टी घडल्या त्या सर्वांच्या समोरच आहेत.

ज्या गोष्टी घडल्या नाहीत त्या कोणत्या? तर, जशी शेती आणि शेतकऱ्यांची प्रगती व्हायला पाहिजे होती, ग्रामीण



विभागाची प्रगती व्हायला पाहिजे होती, तशी झाली नाही. झाली असेल तर किती लोकांची झाली? टक्केवारीने किती शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळाला? ज्यांना वीज आणि पाणी मिळालं, त्यांच्याकडे कारखानदारी आली, तीन्ही गोष्टी ज्यांना मिळाल्या. त्यांचा त्यांना खूप फायदा झाला. अशी ही टक्केवारी किती असेल? तर ती शेतकऱ्यांमध्ये केवळ १० टक्के आहे. म्हणजे सर्व जनतेमधील १० टक्के नव्हे. थोडक्यात म्हणजे सत्तर टक्क्यांचे



दहा टक्के म्हणजे सात, आठ टक्के शेतकरी यामुळे पुढे गेले. पूर्वी जमीनदार म्हणून पुढे होते आता शेतकरी म्हणून ते पुढे आहेत. त्यांच्याकडे खूप सुबत्ता आहे. या सुबत्तेबरोबर त्यांचे काय झाले? तर त्यांच्यापैकी बहुतांशी लोक व्यसनाधीन झाले. म्हणजे शेतकऱ्यांमध्ये जी प्रगती झाली त्यात व्यसने घुसली. जी औद्योगिक प्रगती झाली, त्यातही ठराविक घराण्यांची मक्तेदारी राहिली. तो आकडा जर त्यावेळी २५ होता तर तो आता २५० झाला आहे एवढंच मात्र म्हणावं लागेल. पण आज तरी तो २५० आहे. त्यापेक्षाही अधिक आहे असे तरी दिसत नाही. म्हणजे अजूनसुद्धा सर्वसाधारणपणे ज्ञान ही एक इंडस्ट्री आहे. ती एक मिळकत आहे. ती सर्वदूर पसरलेली आहे. प्रत्येक माणसाच्या घरात ती पोहोचलेली आहे. हे फक्त सॉफ्टवेअरमध्ये म्हणजे संगणकाच्या क्षेत्रात झाले आहे. आणि त्यामुळे तिथे फार सुबत्ता आली. पंधरा ते पंचवीस लाख लोक खूप सधन झाले. तुम्ही बघता आहातच, की त्यांच्यामध्येच 'रेव पार्टी' होते आहे. अनेक लोक व्यसनाधीन झाले आहेत. एवढंच नव्हे, तर ते बेढब झाले आहे. त्यांना असे वाटते की, हे असे आयुष्य आता नको आहे. मला आता तसं जगायचं नाही. आता मला केवळ शेती बघायची आहे. आय. आय. टी. चा इंजिनिअर असं म्हणायला लागला आहे. म्हणजे तो सुद्धा सुखी नाही. इथं दोन गोष्टी मला प्रकर्षाने जाणवतात. औद्योगिक प्रगती झाली, उत्पादकता वाढली. आपण काही बाबतीत स्वावलंबी झालो याचा अर्थ आपण सुखी आणि समाधानी झालो का? या प्रश्नाचे उत्तर यातून मिळत नाहीत.

गेल्या १५०-२०० वर्षातील वैज्ञानिक अविष्काराचा लाभ मिळून भारतीय समाजाची भौतिक तसेच बौद्धिक प्रगती झालेली आहे. पण समाज सुखी व समाधानी झाला का, याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. आपल्या मुल्यांचे अधःपतन झाले आहे व होत आहे. श्रमाची जागा यंत्राने घेतली आहे. उत्पादकता वाढली व उत्पन्न वाढले. साहजिकच सुबत्ता सुद्धा मिळाली. पण कोणाला? काही मोजक्याच लोकांना सुबत्ता मिळाली. विषमता वाढली. वाढलेला सर्व पैसा त्या खेड्यांपर्यंत, सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचला का? असं विचारलं तर त्याचं उत्तर नाही, असंच आहे. त्याचं कारणच आहे की, आजही ती परिस्थिती कायम आहे. एवढे कोट्यावधी रुपये आपण कमावून सुद्धा ती कायम आहे. याचं कारण असं की, प्रत्येक सामाजिक क्षेत्रामध्ये आपलं अध:पतन झालं. जिथे ते होण्याची शक्यता नव्हती, तिथेसुद्धा ते कसे होईल असा जणू आपण विडाच उचलला. आपणच शेतकऱ्यांना असं सांगितलं की, तुम्हाला कर्जाचे पैसे भरायची गरज नाही. आम्ही तुमचं कर्ज माफ करणार आहोत. आपल्याला शेतकऱ्यांना मदत करायची होती तर तुम्ही तुमचं कर्ज




ठिबक सिंचनासंबंधी मुंबईतील ताज हॉटेलमध्ये झालेल्या चर्चासत्रात भवरलाल जैन भाषण करताना, समोर बसलेला श्रोतृवर्ग.

दहा ऐवजी वीस वर्षांनी भरा असं म्हणायला तर हरकत नव्हती? आपल्याला हळूहळू शेतकऱ्याच्या मालाच्या किंमती वाढवता आल्या असत्या. त्याची उत्पादकता वाढवता आली असती. या दोन गोष्टी जर आपण वाढवू शकलो असतो, तर त्याला आपण सशक्त करू शकलो असतो आणि त्याने शासनाचे कर्ज नक्की भरले असते. पण तू पैसाच भरायचा नाही म्हटल्यानंतर त्याच्या नियतमध्ये खोट येते. पुढच्या वेळेलाही तो असाच विचार करतो की, आता जे कर्ज मी घेतो आहे ते परत करायची काय गरज आहे? पाच पंचवीस वर्षांनी होतेच याची सुट्टी . अशा रितीने आपण ज्या शेतकरी  वर्गाने ही सभ्य संस्कृती सांभाळून ठेवली होती, त्यांना सुद्धा खराब करायला सुरुवात केली.

महिला वर्ग. ग्रामीण भागातील शेतकरी महिला तसेच शहरातील महिलांनी आपली संस्कृती सांभाळली, जपली. पाश्चात्य संस्कृतीचे बटबटीत प्रदर्शन दाखवून या सर्व प्रसार माध्यमांनी महिला वर्गामध्ये जे आकर्षण निर्माण केले त्यामुळे त्यांनी आपल्या संस्कृतीशीसुद्धा तडजोड करायला सुरुवात केली. त्यामुळे नेमके काय झाले? जे झाले ते असे की, त्याच महिला ज्यांच्यामुळे आत्तापर्यंत आपली संस्कृती जिवंत राहीली, हजारो ’ वर्षे जिवंत राहीली, त्याच महिला ज्यांच्यावर ही भिस्त आजही आहे आणि पुढे सुद्धा ती तशीच राहणार आहे कारण महिलाच फक्त आपल्या देशात आपली संस्कृती जपायचे काम करू शकतात, त्यांचाच नैतिक ऱ्हास सुरु झाला. पुरुषांनी जगभरात कुठेच संस्कृती जपण्याचे काम केलेले नाही. पुरुष हा नेहमीच असा फिरत राहीला आहे. निर्मितीचे जे काम आहे, हे अशा रितीने व्हायला नको असे आपल्याला वाटायला लागले आहे. मला सर्वात जास्त शल्य या गोष्टीचे वाटते की, एखादी स्त्री ज्यावेळी एखाद्या मुला-मुलीला जन्म देते, त्यावेळी ती जे काम करते किंवा तिने जे काम केले आहे ते काम तिने कोणताही एखादा कारखाना आणि खूप मोठा व्यवसाय उभा करण्याच्या कामापेक्षा कमी प्रतीचे आहे का? कारण हा जो व्यवसाय आहे तो चालविणारा कोण आहे शेवटी? आणि कोणासाठी आहे? म्हणजे शेवटी हे जे पुनरुत्पादनाचे काम आहे हे या समाजासाठी आहे. या जनतेसाठी आहे. हे जर खरे असेल आणि तुम्ही ती जनताच कमी करणार असाल, ती उत्पन्नच होऊ देणार नसाल आणि आमचे भवितव्यच घडू देणार नसाल तर या समाजाचे काय होईल? आज नाही तर उद्या तुम्हाला हा विचार करणे क्रम:प्राप्त होणार आहे. चीनमध्येसुद्धा पंचवीस वर्षांनंतर एवढी भयानक परिस्थिती होणार आहे की, जगणंच मुळी हे



कोणासाठी? कारण खायलाच कोणी राहीले नाही, तर तुम्ही युद्ध करूनही काय करणार आहात? त्यामुळे आपण स्त्रियांना अधिकार देऊन त्यांना सशक्त करायला हवे होते. त्याचबरोबर त्यांना ज्या पद्धतीने त्यांची संस्कृतीआधीपासून होती तिची जपवणूक करायला प्रवृत्त करायला हवे होते, त्या शिक्षण क्षेत्राला आणि संस्कार क्षेत्राला आपण दुर्लक्षित केले आहे. ग्रामीण भागात ज्या शेतकऱ्याला सशक्त करणे गरजेचे होते, त्यांना आपण सशक्त करू शकलो नाही आणि त्यामुळे त्याच्या विचारामध्ये एवढा मोठा फरक आपल्याला आढळतो. मला असं वाटतं की, इथं दुफळी निर्माण झाली आहे. शहर वेगळे, खेडे वेगळे! श्रीमंत वेगळे आणि गरीब वेगळे! केवढी मोठी दरी निर्माण झाली! आता एवढ्या खोलवर ती रुजून गेली आहे की, वर असंही वाटायला लागलं आहे की, कसा काय एक माणूस चार हजार पाचशे कोटी खर्च करून घर बांधू शकतो? लाखो, कोट्यावधी लोक आपल्या देशात असे असतील की. ज्यांना राहण्यासाठी साधी झोपडी देखील असू शकत नाही. याला आपण या देशाची प्रगती म्हणू शकणार नाही. याला 'मेरा भारत महान' असे तुम्ही म्हणणार का? माझ्यासमोरचा हा प्रश्न मला तरी अस्वस्थ करणारा आहे. इतरांना तो अस्वस्थ करतो की नाही, याची मला कल्पना नाही. पण माझा ग्रामीण जीवनाशी अजूनही तरी संबंध कायम आहे. मला असे वाटते की,हा भारत आणि तो इंडिया हा वेगळा होऊ नये. गांधीजींच्या

जीवनातील किंवा त्यांच्या विचारातील जो भारत होता तो खरंच यापेक्षा आपल्याला परवडला असता! जरी आपण थोडे मागासलेले राहीलो असतो तरी चालण्यासारखे होते. आज प्रगतीच्या कमी वेगाने गेलो तरी अजूनही वेळ निघून गेलेली नाही. मला असे वाटते की, जिथपर्यंत आज आपण येऊन पोहोचलो आहोत, त्यापुढे ही जायला आपल्याला आत्ता तरी संधी आहे. अजूनतरी शासनाने कमीत कमी जे आपल्या संविधानामध्ये लिहिलेले आहे, घटनेमध्ये लिहिलेले आहे, तेवढे तरी करावे. म्हणजे एकूण अर्थसंकल्पाच्या पाच ते सात टक्के पैसे शिक्षणावर खर्च करायलाच पाहिजेत. शिक्षण हे देखील मूल्याधारित व्हायला पाहिजे. केवळ कौशल्य देणारे शिक्षण नको, तर संस्कारसुद्धा देणारे शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक झालीच पाहिजे आणि त्याचबरोबर ग्रामीण भागासाठी



किमानपक्षी ठरलेली पन्नास टक्के गुंतवणूक होईल असे पहावे. अशी एक शपथ या स्वातंत्र्यदिनी आपण घेतली पाहिजे असे मला वाटते.

वरील सर्व विचारांवरून भाऊंचा समाज व राष्ट्र आणि महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन व विचार किती प्रगल्भ आणि पुरोगामी व परिवर्तनवादी होता हे लक्षात येईल.

**– डॉ. दि.मा.मोरे**
**मो. ९४२२७७६६७०**



# भवरलालजी जैन

आपल्या प्रत्येक क्षेत्रात आणि उपक्रमात सर्वोच्च स्थानावर जाण्याचे उद्दिष्ट पार पाडत असतानाच, समाजाचा एक घटक म्हणून आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान भवरलालजींनी सतत ठेवले होते. आपण मिळविलेल्या धनातील काही वाटा समाजासाठी राखून ठेवून त्याचा वापर गरजू परंतु गुणीजणांना होईल अशी यंत्रणा त्यांनी उभी केली. कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी योजनेद्वारे समाजासाठी चांगले काम करणाऱ्या संस्थांना बरीच मदत केली. गरजूंना आवश्यक ती साधनसंपत्ती पुरवून त्यांच्या 'पाठीवर हात ठेवून लढ' असे म्हटल्यामुळे या माध्यमाद्वारे कित्येकजणांनी राज्य पातळीवरच नव्हे तर देशपातळीवरही आपली पात्रता सिद्ध केली आहे. या सर्व प्रकारच्या कामातून आणि उपक्रमातून भवरलालजींनी शेतकरी समाजाच्या उन्नतीसाठी ३-४ दशके दिलेल्या योगदानामुळेच भारत सरकारकडून त्यांना 'पद्मश्री' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**विद्यानंद रानडे**
सेवानिवृत्त सचिव, पाटबंधारे विभाग

# द्रष्टे व कर्तबगार उद्योग महर्षी





पाटबंधारे विभागात ३४ वर्षे नोकरी करुन १९९५ साली सेवानिवृत्त होईपर्यंत राज्यातील सर्व प्रकल्पांवर प्रवाही पद्धतीने पाणी देण्याची व्यवस्था असल्यामुळे 'सूक्ष्म सिंचन पद्धती' बाबत मला फारशी माहिती नव्हती. त्यानंतर जानेवारी १९९६ ते सप्टेंबर १९९९ या कालावधीत डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाचे' कामकाज चालू होते. त्यावेळी झालेल्या काही चर्चासत्रात आणि क्षेत्रीय भेटीमध्ये माझा सहभाग होता. या आयोगाचे श्री. भवरलाल जैन, अध्यक्ष जैन उद्योग समूह, जळगाव हे एक सभासद होते. त्यावेळी माझा आणि श्री. भवरलालजींचा चांगला परिचय झाला. त्याचबरोबर जलसंपत्तीच्या विकासामध्ये विविध उद्योगांतून त्यांच्या कर्तबगारीची जाणीव झाली. ठिबक सिंचन आणि तुषार या क्षेत्रात त्यांनी आपल्या राज्यात आणि देशात केलेल्या पायाभूत कामाचीही जाण झाली. त्यामुळे गेल्या २०-२२ वर्षामध्ये जलसंपत्ती विकासाच्या क्षेत्रामध्ये त्यांनी किती जाणीवपूर्वक आणि नियोजनपूर्वक काम केले आहे हे सांगण्याचा मी या लेखात प्रयत्न केला आहे.

पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या राजस्थानसारख्या राज्यातून भवरलालजींचे पूर्वज व्यवसाय क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी महाराष्ट्रात आले. व्यवसायात मिळालेल्या पैशातून जळगाव नजिकच्या वाकोद खेड्यामध्ये शेती घेऊन तेही व्यवसाय करु लागले. तेथे बालपण गेल्यामुळे कोरडवाहू शेतीमधील अनिश्चितता




दुसऱ्या जल व सिंचन आयोगाची जळगावच्या जैनहिल्सवर झालेली बैठक

यापुढे सूक्ष्म सिंचन पद्धतींचे स्थान किती महत्त्वाचे होणार आहे याचीही मला जाणीव झाली. त्यावेळी एका प्रकल्पासाठी १९९७-९८ मध्ये मला भवरलालजींनी तांत्रिक सल्लागार म्हणून काम करण्याची संधी दिली. त्यावेळी प्रथमतः मी जळगाव येथील जैन हिल्स, जैन प्लॅस्टिक पार्क आणि इतर ठिकाणी चालू असलेले काम पाहिले. त्यानंतर तांत्रिक सल्लागार म्हणून मी त्या परिसरास बऱ्याच वेळा भेटी दिल्या.

त्यावेळी झालेल्या चर्चांमधून श्री. भवरलालजींच्या व्यक्तीमत्त्वाची ओळख झाली आणि त्यातून त्यांनी उभारलेल्या त्यांनी त्या काळी अनुभवली. शिक्षणाचे महत्व जाणून त्यांनी जळगाव येथून कॉमर्सची पदवी मिळवली. आत्मविश्वास असला आणि कर्तबगारी असली तरी भांडवलाअभावी केरोसीन विक्रीचा व्यवसाय त्यांनी जळगाव येथे सुरु केला. परंतु बेभरवशाच्या पर्जन्याधारित शेतीतून शेतकऱ्यांची होणारी दुर्दशा पाहिल्यामुळे त्या क्षेत्रातच आपण काही तरी करावे अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली असावी. त्यामुळे अल्पावधीतच त्यांनी धाडस करुन त्यावेळी महाग असणाऱ्या लोखंडी पाईपना स्वस्त पर्याय म्हणून प्लॅस्टिक (पॉलीथीन) पाईप बनविण्याचा लहानसा

कारखाना जळगावनजिक उभारुन आपल्या पुढील वाटचालीची मुहूर्तमेढ रोवली. शेतीसाठी पाणी वाहून नेणाऱ्या या पर्यायाला विहिरीवर सिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

अशातच त्यांना सूक्ष्मसिंचन क्षेत्रात जागतिक स्तरावर क्रांती करणाऱ्या इस्त्राईल या देशाला भेट देण्याचा योग आला. त्या देशातील मर्यादित व अल्प उपलब्ध पाण्यातून ठिबक सिंचन प्रणालीच्या वापराद्वारे चांगल्या गुणवत्तेच्या उत्पादित शेतमालाची निर्यात केल्यामुळेच त्या देशात सुबत्ता निर्माण झाली होती. तेथील अशा बऱ्याच योजनांना भेटी दिल्यामुळे ठिबक सिंचन पद्धतीची क्षमता आणि उपयुक्तता याची त्यांना जाणीव झाली. त्या देशाला भेट दिल्यानंतर सिंचन क्षेत्रातील अशा प्रगतीमुळे बनविण्याला पर्याय नसल्याचेही त्यांच्या लक्षात आले. विचारांना कृतीची जोड देऊन मनातील संकल्पनांना मूर्त स्वरुप देण्याचे अवघड आणि किचकट काम त्यांनी नेटाने आणि चिकाटीने पार पाडले. अल्पावधीतच जळगाव नजिकच्या प्लॅस्टिक पाईप उत्पादन करण्याबरोबर ठिबक सिंचन यंत्रणेच्या उत्पादनास सुरुवात झाली. सामान्य शेतकऱ्याला त्यावेळी पूर्णपणे अपरिचित असलेल्या यंत्रणेचा वापर सुलभतेने करता यावा यासाठी उपाय करणे आवश्यक होते. त्यामुळे शेतकऱ्याच्या विहिरीवर योग्य त्या क्षमतेचा विद्युत पंप बसवून सर्व शेतात वितरण यंत्रणा उभारण्याची आखणी, अंमलबजावणी करण्यासाठी सल्ला देणारी यंत्रणा उभारावी लागली. त्याचबरोबर विक्रीनंतर त्यांना सेवा



पुण्यातील हॉटेल ब्ल्यू डायमंडमध्ये ठिबकसंबंधी झालेल्या चर्चासत्रात भवरलालजी जैन भाषण करताना, समोर आप्पासाहेब पवार, संपतराव जाधव, डॉ. ज्ञानदेव हापसे, शंकरराव मगर, दत्ता कांचन, डॉ. सुधीर भोंगळे व इतर मान्यवर.


भारले गेलेल्या अनेकजणांनी त्यावर लेख लिहिले. संशोधन प्रबंध परिषदांमध्ये सादर केले. येवढेच नव्हे तर पुस्तकेही लिहिली. परंतु भूपृष्ठावरील आणि भूजलातून उपलब्ध होणाऱ्या मर्यादित जलसंपत्तीमुळे दक्षिण भारतातील शेतकऱ्यांसाठी हे तंत्रज्ञान वरदान ठरु शकेल हे आपल्या पहिल्याच अभ्यास दौऱ्यात भवरलालजींना जाणवले.

ठिबक सिंचन यंत्रणेची इस्त्राईलमधून आयात करणे हा पर्याय अतिशय खर्चिक होता. आपल्या देशात तोपर्यंत या यंत्रणेचे उत्पादन होत नसल्यामुळे ठिबक सिंचन यंत्रणा येथेच पुरविण्यासाठी तंत्रज्ञांना प्रशिक्षित करण्यासाठी जळगाव येथे 'गुरुकुल' बांधण्यात आले. त्यांच्यामार्फत विक्रीपश्चात सेवा देण्याचे काम दक्षिणेतील सर्व राज्यात होऊ लागले. या सर्व नियोजनपूर्वक केलेल्या कृतींमुळेच सिंचन प्रणालीचा वापर भूजलातून होणाऱ्या सिंचनासाठी मध्य व दक्षिण भारतात होऊन हरित क्रांती झाली.

ठिबक सिंचनापाठोपाठ तुषार सिंचन यंत्रणेची निर्मिती करण्याची आवश्यकता जाणवू लागली. त्यानंतर रेनगन, हलविता येतील असे तुषार सिंचन संच, फिल्टर, विद्राव्य खताचा वापर

तुषार संचाच्या साहाय्याने गादीवाफ्यावर घेतलेले सोयाबीनचे पीक






करण्यासाठी व्हेंचुरी, लॅटरल्स वगैरे सर्व जळगावमध्ये निर्माण होऊ लागले. वेगवेगळ्या आकाराच्या पीव्हीसी पाईप्स, हाय डेंसिटी पाईप्सही बनविण्यात येऊ लागले. विहिरीवरील सिंचनासाठी लागणारी तसेच मोठ्या प्रकल्पातून बऱ्याच व्यापक क्षेत्रावर ठिबक/तुषार सिंचन यंत्रणा बसविता येईल याबद्दलचे अद्ययावत तंत्रज्ञान अभियंत्यांना देण्यात आले आणि अशा प्रकारची बरीच कामे कर्नाटक, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश यामध्ये उभारण्यात आली.

जागतिक मान्यतेच्या दर्जाचे उत्पादन करताना कोणत्याही परिस्थितीत गुणवत्तेमध्ये कधीही कोणत्याही प्रकारची तडजोड करायची नाही यावर भवरलालजींचा कटाक्ष असल्यामुळे सर्व उत्पादित मालाला विश्वासार्हता व जागतिक पातळीवर स्थान मिळावे. या क्षेत्रात सर्व जगात जे अद्ययावत तंत्रज्ञान अवलंबिले जात आहे त्यासाठी लागणारी सर्व उपकरणे प्लॅस्टिक पार्क जळगाव येथे बनविली जात आहेत. येवढेच नव्हे तर ठिबक सिंचन यंत्रणा बनविण्यात अग्रणी असणारी इस्राईलमधील नानदान ही कंपनीही जैन इरिगेशन सिस्टिम लि. ने विकत घेतली आहे. परिणामतः जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेड यांनी सूक्ष्मसिंचन क्षेत्रात सर्व जगात अग्रगण्य स्थान प्राप्त केले आहे.

सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर केल्यामुळे मर्यादित भूजलाचा अधिक कार्यक्षम वापर होऊन सिंचन क्षेत्रात वाढ झाली. प्रति हेक्टरी उत्पादन आणि त्याची गुणवत्ता यात वाढ झाल्यामुळे आणि बहुमूल्यदायी पिके घेतल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली. भूजलाच्या प्रत्येक थेंबातून अधिक उत्पादन, रोजगार आणि अर्थनिर्मिती होऊ लागली. (More crop, cash and jobs per drop of water) भवरलालजींनी गेल्या ३-४ दशकात केलेल्या अथक प्रयत्नातून उभ्या केलेल्या प्लॅस्टीक पार्क आणि

जळगावच्या जैन हिल्सवर अतिसघन पद्धतीने उभी केलेली आंब्याची बाग व पाणी साठविण्यासाठी तयार केलेला बंधारा.






जैन हिल्स येथील उपक्रमांद्वारे आपल्या राज्यात आणि देशात आधुनिक सूक्ष्मसिंचन पद्धतीचा अवलंब शक्य झाला आहे. आता तर राज्यातील सर्व मोठ्या प्रकल्पांवर बारमाही पिकांसाठी सूक्ष्मसिंचनाचा वापर करणे अनिवार्य असून येत्या ८-१० वर्षात ते प्रत्यक्षात येईल असे वाटते.

जमीन आणि पाणी या घटकांच्या नियोजनपूर्वक वापरातून कमी व अनिश्चिततेच्या पावसाच्या प्रदेशातही नंदनवन कसे फुलविता येते हे पाहायचे असल्यास जैन हिल्स जळगावला भेट द्यावी. सुमारे २०-२५ वर्षांपूर्वी निष्पर्ण असलेल्या उजाड टेकड्यांवर पडणारे पावसाचे पाणी उतारावरील जमिनीचे पायऱ्यापायऱ्यात सपाटीकरण करत (Terracing) चरांमध्ये पावसाचे पाणी साठवून त्याच्या पायथ्याशी पाझर तलाव बांधून त्याद्वारे भूजलभरण करुन पाण्याची उपलब्धी वाढविली. गिरणा नदीतून पाणी उपसून त्याचा वापर केला. सुमारे ८ वर्षांपूर्वी गिरणा नदीवर जैन हिल्सनजिक कोल्हापूर पद्धतीचा बंधारा स्वखर्चात बांधून त्यातील काही पाणी आपण वापरुन उरलेल्याचा शासनामार्फत लोकांसाठी वापर होऊ लागला. अशा प्रयत्नातून या टेकड्यांवर उत्तम जातीच्या आंब्याची आणि इतर फळांची झाडे वाढून टेकडी हिरवीगार झाली आहे. हा सर्व उपक्रम अथपासून इतिपर्यंत मी वेळोवेळी दिलेल्या भेटीत प्रत्यक्ष पाहिला आहे. हे सारे करण्यासाठी दृष्टी असावी लागते, डोळ्यापुढे स्वप्ने असावी लागतात आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे दूरदृष्टी असून आपल्या स्वप्नांना प्रत्यक्षात मूर्तस्वरुप देण्यासाठी जिद्द आणि अपार कष्ट करण्याची तयारी लागते हेच खरे !

शेतीतील नगदी पिकांचे आणि फळांचे उत्पादन वाढवून जो फायदा होतो त्यापेक्षा जास्त फायदा त्या नाशवंत मालावर प्रक्रिया करुन त्याच्या मूल्यवर्धनातून होत असतो. हे प्रत्यक्षात आणण्यासाठी पेपेनचे उत्पादन, कांदा निर्जलीकरण प्रकल्प, विविध प्रकारच्या फळांचे रस यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन प्रक्रिया केंद्रातून होऊ लागले. त्यासाठी लागणारा कच्चा माल हंगामाआधीच हमीभाव ठरवून शेतकऱ्यांकडून विकत घेण्यात आला. आपल्या देशात मिळणाऱ्या मुबलक सौर ऊर्जेतून वीज निर्मिती करण्याचा एक फार मोठा प्रकल्प जैन हिल्स परिसरात उभारण्यात आला आहे. त्याचबरोबर ज्या भागात विजेची उपलब्धता नसेल अशा ठिकाणी विहिरीवर सूक्ष्मसिंचन पद्धतीचा अवलंब करता यावा यासाठी सौर उर्जेवर चालणारे विद्युतपंप प्रयत्नपूर्वक विकसित केले गेले. केळ्यासारख्या आणि इतर पिकांचा शेतीतील वाढीचा काळ कमी व्हावा आणि उत्तम गुणवत्तेची रोपे अल्प किंमतीत मिळावीत यासाठी टिश्यूकल्चर तंत्रज्ञानातून रोपे तयार करण्याचे केंद्र उभारण्यात आले. त्यातील जातीवंत रोपे विकत घेऊन आज जळगावनजिकच्याच नव्हे तर इतर भागातील केळी आणि इतर पिके वाढविली जात आहेत. आधुनिक सिंचन पद्धतीच्या वापरातून पाण्याची वाढलेली उपलब्धता, उतीसंवर्धनातून रोपांची निर्मिती, सौर उर्जेचा वापर, शेतमालावर प्रक्रिया करुन त्याचे मूल्यवर्धन या सर्व गोष्टी थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्याला विकासाचा मार्ग दाखविताना या क्षेत्रातील भवरलालजींचे योगदान फार मोठे आहे.



जळगावच्या जैन व्हॅलीत फार्मफ्रेश कंपनीमध्ये प्रक्रियेसाठी बाहेरून आलेला आंबा.



**जैन गुरुकुल-शेतकरी मार्गदर्शन, प्रशिक्षण व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषद केंद्र.**








जैन हिल्स परिसरात विश्रामगृहे, गुरुकुलसारखी प्रशिक्षण केंद्रे, ऑडिटोरियम, भोजनव्यवस्था आणि भोजनगृहे, होस्टेल अशा विविध इमारती एका पाठोपाठ बांधल्यामुळे सूक्ष्मसिंचनाबद्दलचे प्रशिक्षणच नव्हे तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा भरविण्यासाठी उत्तम सोई उलब्ध झाल्या. त्यामागेही भवरलालजींची दूरदृष्टी दिसून येते. या राज्यात अशा सोई उपलब्ध झाल्या तर आंतरराष्ट्रीय स्तरावर चालू असलेल्या विचारधारा देशातील तज्ज्ञांना ज्ञात होतील आणि विचारांचे आदान-प्रदान होऊन सिंचन क्षेत्राचा आधुनिकतेकडे होणारा प्रवास वेगाने होईल हे मात्र त्यामुळे साध्य झाले. जैन इरिगेशनतर्फे आफ्रिकेतील केनिया, झांबिया, रुआंडा वगैरे देशात तसेच हिमाचल प्रदेश, भूतान वगैरे ठिकाणी सूक्ष्मसिंचन प्रकल्पांसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून मला जाण्याची संधी मिळाल्यामुळे माझ्या ज्ञानात भर पडली. इटली येथील बारी या संस्थेमध्ये प्रशिक्षणासाठी २०१२ साली माझ्याबरोबर जैन इरिगेशनमधील ९ कृषिअभियंत्याचे पथक १० दिवसांच्या दौऱ्यासाठी श्री. अजित भाऊंनी पाठविले. इटली आणि स्पेन या देशातील काही प्रकल्पांवर प्रचलित असलेल्या अत्याधुनिक अशा On demand irrigation system चा हा अभ्यास दौरा होता. आपल्या अभियंत्यांना अद्ययावत ज्ञान प्राप्त व्हावे हाच त्यामागील भवरलालजींचा उद्देश होता.

जैन हिल्स परिसरात वर उल्लेखिलेल्या विविध इमारतींपैकी 'गुरुकुल' या इमारतीला उत्तम रचना, आर्किटेक्चर आणि गुणवत्ता याबद्दल त्यावर्षीचा प्रथम पुरस्कार मिळाला होता. त्याहीपेक्षा उल्लेखनीय काम म्हणजे देशाच्या भावी पिढीला योग्य असे शिक्षण आणि संस्कार हे गुरुकुल पद्धतीद्वारे देण्याचा त्यांनी राबविलेला उपक्रम. अशा शिक्षणातून सुसंस्कारित आणि जबाबदार नागरिकत्वाची



‘गांधीतीर्थ’-महात्मा गांधींच्या जीवनकार्यावर आधारित जगातील एकमेव ऑडिओ-गाइडेड संग्रहालय.

जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी ‘अनुभूती निवासी शिक्षणसंस्थेची’ स्थापना या परिसरात करण्यात आली. एका उत्तम शिक्षणसंस्थेची’ स्थापना या परिसरात करण्यात आली. एक उत्तम शिक्षणसंस्था म्हणून अल्पावधीतच ती गणली जाऊ लागली. या सर्वांवर कळस म्हणून की काय ‘महात्मा गांधी संशोधन संस्था’ अर्थात ‘गांधीतीर्थ’ ही सुंदर वास्तु जैन हिल्स परिसरात उभारण्यात आली. सुंदर अशा लालसर राजस्थानी दगडात बांधलेली आणि नाविन्यपूर्ण परंतु पारंपारिक आर्कीटेक्चर असलेली इमारत हे एक आकर्षण स्थान झाले आहे. त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे महात्मा गांधींच्या संपूर्ण जीवनपट आणि त्यांची शिकवण ही छायाचित्रातून आणि भित्तीचित्रांतून फार प्रभावीपणे मांडली गेली आहे. समाजात लोप पावत चाललेल्या सत्प्रवत्तींची पुनर्स्थापना आणि जोपासना व्हावी हे यामागील उद्दीष्ट सफल व्हावे. या परिसरातील सर्व इमारती म्हणजे वास्तुशास्त्रातील उत्कृष्ट नमुने म्हणून जे गणले जातात त्यामागील प्रेरणा आणि परिश्रम भवरलालजींचेच आहेत हे मात्र खरे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला आणि अभियंत्याला आवश्यक ते निर्णय स्वातंत्र्य देताना त्याला त्याच्या जबाबदाऱ्या पेलण्यासाठी आणि आपल्यातील क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले जात असे. कृषी अभियंत्यांना अभियांत्रिकीचे आणि





त्या त्या व्यवसायातील अद्ययावत ज्ञान प्राप्त होईल अशा सर्व संधी उपलब्ध करुन देण्याच्या भवरलालजींच्या वृत्तीला दाद दिल्यावाचून राहावत नाही. या सर्वांमुळेच ‘मी रोजी रोटी कमावतो आहे’ किंवा ‘मी गवंडीकाम करीत आहे’ असे उत्तर देणाऱ्यांची संख्या जैन उद्योगसमुहाच्या सर्व उपक्रमात नगण्य आहे आणि ‘मी मंदिर उभारतो आहे’ असे म्हणणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. आपले कोणतेही काम करताना अंतिम उद्दिष्टाकडे पाहून ते करावे, उत्तम गुणवत्तेचे आणि काळाच्या कसोटीवर दीर्घकाळ टिकून राहून ते दीर्घकाळ सेवा देत राहील असे करावे. हाच मुलभूत विचार प्रत्येकाच्या आचार-विचारात प्रतिबिंबीत होईल हा आदर्श आपल्या स्वतःच्या वर्तनातून भवरलालजींनी सर्वांना घालून दिला.

आपल्या प्रत्येक क्षेत्रात आणि उपक्रमात सर्वोच्च स्थानावर जाण्याचे उद्दिष्ट पार पाडत असतानाच, समाजाचा एक घटक म्हणून आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान भवरलालजींनी



भारताच्या राष्ट्रपती महामहिम सौ. प्रतिभाताई पाटील या डॉ. भवरलाल जैन यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करताना.

सतत ठेवले होते. आपण मिळविलेल्या धनातील काही वाटा समाजासाठी राखून ठेवून त्याचा वापर गरजू परंतु गुणीजणांना होईल अशी यंत्रणा त्यांनी उभी केली. कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी योजनेद्वारे समाजासाठी चांगले काम करणाऱ्या संस्थांना बरीच मदत केली. गरजूंना आवश्यक ती साधनसंपत्ती पुरवून त्यांच्या 'पाठीवर हात ठेवून लढ' असे म्हटल्यामुळे या माध्यमाद्वारे कित्येकजणांनी राज्य पातळीवरच नव्हे तर देशपातळीवरही आपली पात्रता सिद्ध केली आहे. या सर्व प्रकारच्या कामातून आणि उपक्रमातून भवरलालजींनी शेतकरी समाजाच्या उन्नतीसाठी ३-४ दशके दिलेल्या योगदानामुळेच भारत सरकारकडून त्यांना 'पद्मश्री' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भवरलालजींच्या या साऱ्या वाटचालीमध्ये त्यांना सतत प्रोत्साहन आणि साथ देत घरची आघाडी सांभाळणाऱ्या चारही मुलांना सुसंस्कारीत करण्यात आणि सुना-नातवंडांवर तशीच माया करुन वाढविणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. कांताबाई यांचा वाटा तेवढाच महत्त्वाचा आहे. भवरलालजींनी त्यांच्यावर लिहिलेल्या 'ती आणि मी' या सुंदर पुस्तकामध्ये त्यांच्या सहकार्याचे, कसोटीच्या प्रसंगांमध्ये त्यांच्यामागे ठामपणे उभे राहून आधार देणाऱ्या व्यक्तीमत्वाचे फार छान वर्णन केले आहे. पतीच्या यशामागे पत्नीचाही मोठा वाटा असतो हे वचन त्यांनी सार्थ करुन दाखविले. भवरलालजींनी आपल्या प्रत्येक मुलाला त्यांच्या व्यक्तीमत्वाचा आणि अंगभूत क्षमतेचा पूर्ण वापर करता येईल असे कार्यक्षेत्र जैन समुहाच्या उपक्रमामध्ये निवडून त्यांचेवर पूर्ण जबाबदारी सोपविली. हे करतानाच आपल्या विचारातील, दृष्टीकोनातील, कार्यपद्धतीमधील आणि अंतिम उद्दीष्टांमागील सातत्य कायम राहील हेही त्यांनी पाहिले.

असे असले तरीही भवरलालजींच्या व्यवसायात काही चढउतार आले होते. परंतु त्यामुळे खचून न जाता स्थिरबुद्धीने विचार करुन प्रत्येक संकटाचे संधीमध्ये रुपांतर करुन (Be treating every adversity as an opportunity) त्यांनी त्यावर मात केली. येवढेच नव्हे तर जैन हिल्स येथे हॉलमध्ये वर्णन केलेल्या त्यांच्या चांगल्या उपक्रमांबरोबर अपयश आलेल्या उपक्रमांचीही माहिती देण्यात आली आहे. राज्यातील तसेच परराज्यातील शेतकरी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांच्या कार्यशाळा जैनहिल्स येथे दरवर्षी भरवून






सौ. कांताबाई आणि भवरलाल जैन.

आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करुन, उपलब्ध जलसंपत्तीच्या कार्यक्षम वापरातून आपले राहणीमान कसे उंचावता येईल याचे प्रशिक्षण दिले. महाराष्ट्र राज्यात 'सिंचन सहयोग' या संस्थेमार्फत दरवर्षी राज्याच्या एका प्रदेशात सिंचन परिषद भरवून त्यानजिकचे शेतकरी, अभियंते आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये चर्चासत्रे घडवून आणली जातात. त्या परिषदांना आर्थिक मदत, तेथील प्रदर्शनात सहभाग, आधुनिक सिंचन पद्धतीवर सादरीकरण अशा प्रकारे त्यामध्ये कायम सहभाग असेल.

सन २०१२ मध्ये आम्ही १० जण इटलीतील बारी येथील संस्थेमध्ये आधुनिक सिंचन पद्धतीसाठीच्या अभ्यास दौऱ्यावर गेलो तेव्हा मला जाणवले की तशा प्रकारच्या संस्थेसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा जैन हिल्स परिसरात आहेत. प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक असणारे तज्ज्ञ तेथे आणि महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे सुरुवातीस देशातील अभियंत्यांना आधुनिक सिंचन पद्धतीचे प्रशिक्षण देणारी संस्था जळगाव येथे उभारावी. त्यानंतर काही वर्षांनी जगातील अविकसीत आणि विकसनशील देशातील अभियंत्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेत तिचे रुपांतर करावे आणि नंतर विद्यापीठही उभारावे. त्यामुळे भवरलालजींनी वयाची ७५ वर्षे पूर्ण करतेवेळी दिनांक १२-१२-२०१२ रोजी मी पत्रात लिहिले होते की ''जैन हिल्स परिसरात असलेल्या सुविधा पाहता आणि आधुनिक सिंचन प्रणालीचे तंत्रज्ञान माहिती असणारे जाणकार तज्ज्ञ पाहता, या प्रणालीचे प्रशिक्षण देण्यासाठी देशस्तरावरीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील निवासी प्रशिक्षण संस्था या परिसरात उभी राहिली तर देशाच्या लौकिकात भर पडेल.''

भवरलालजींना हृदयविकाराचा त्रास होता. त्यासाठी त्यांच्यावर दोन वेळा शस्त्रक्रियाही झाल्या होत्या. पण त्यातून बरे झाले की ते पुन्हा उत्साहाने आपल्या कामाला लागत असत. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी त्यांच्याकडून जास्तीत जास्त कार्य होत रहावे अशीच नियतीची इच्छा असावी. त्यामुळे शेवटपर्यंत ते कार्यरत राहिले होते. परंतु आपणाला कितीही वाटले तरी मरण आपल्या हातात नसते. 'अनायासे न मरणं' एवढी ईच्छाच आपण करू शकतो. त्याप्रमाणे डॉक्टरी प्रयत्न होऊनही उपयोग झाला नाही आणि फारसा त्रास न होता त्यांचे २५ फेब्रुवारी



आधुनिक सिंचन प्रणालीचे तंत्रज्ञान माहितीचे प्रशिक्षण देण्यासाठी देशस्तरावरीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील निवासी प्रशिक्षण संस्था

२०१६ रोजी दुःखद निधन झाले. तरीही पाण्याच्या क्षेत्रातील आधुनिक सिंचन पद्धतीबाबत त्यांनी दिले ते योगदान आणि केलेले पायाभूत काम यांचे सुपरिणाम मात्र चिरंतन राहणार आहेत.

त्यांच्या निधनानंतर जळगाव येथे 'भवरलाल जैन विद्यापीठ' स्थापन करण्याच्या कामास सुरुवात झाली. "Water, sustainable agricultural, renewabale energy and rural development" are the four corner stone of Bhavarlal Jain University. त्यांचे चिरंजीव श्री. अजितभाऊ आणि श्री. अनिल भाऊ यांनी या कामात पुढाकार घेतला. समुहातर्फे गेलेल्या तज्ज्ञांमध्ये माझाही सहभाग होता. हे माझे सुदैव होते. त्यानंतर प्रशिक्षण कार्यक्रमाचा तपशील ठरविण्यासाठी या दोन विद्यापीठातील प्राध्यापक ऑगस्ट २०१८ मध्ये चर्चेसाठी जळगावला आले होते. तेव्हा त्या चर्चासत्रात पण मी भाग घेतला होता. या विद्यापीठात सुरुवातीस काही प्रशिक्षण सत्रे सुरू करून हळूहळू त्यांचे आंतरराष्ट्रीय विद्यापीठात रुपांतर करण्याची संकल्पना आहे. त्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

या संकल्पित विद्यापीठातून अभियंत्यांना आधुनिक सिंचन पद्धतीद्वारे ग्रामीण क्षेत्राच्या उन्नतीचे प्रशिक्षण मिळणे लवकरात







भवरलाल जैन यांनी अशोक, अनिल, अजित आणि अतुल या आपल्या चारही मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्रपणे विकास व्हावा असेच धोरण स्वीकारून त्या पद्धतीने व दिशेने मार्गदर्शन केले.

नेदरलँड देशातील डेल्फ्ट (Delft) येथील जलविद्यापीठ आणि वॅगेनियंजन (Wageningen) येथील कृषी विद्यापीठ या जगप्रसिद्ध विद्यापीठाचे सहकार्याने या विद्यापीठाचे कामकाज व्हावे असे ठरविण्यात आले.त्यासाठी या दोन्ही विद्यापीठातील तज्ज्ञांबरोबर चर्चा करण्यासाठी एक अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला. जानेवारी २०१८ मधील या दौऱ्यासाठी जैन लवकर सुरू होवो या माझ्या शुभेच्छा. तिच कै. भवरलालजींना खरी श्रद्धांजली होईल.

**- विद्यानंद महादेव रानडे**
**२४३३६०६७६, ९८२२७ ९२७९८**
**सेवानिवृत्त सचिव (पाटबंधारे) महाराष्ट्र शासन**

# निर्यातीसाठी इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी महत्त्वाची





# भवरलाल जैन यांची डिसेंबर १९९३ मध्ये डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली मुलाखत

**प्रश्न : इस्त्राईल देशाशी करार करुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या येथे प्रशिक्षण केंद्र काढावे असे का वाटले ?**

**भवरलालजी** : इस्त्राईल आणि भारत या दोन्ही देशांची संस्कृती फार पुरातन आहे. इस्त्राईल हे राष्ट्र म्हणून जरी १९४८ साली निर्माण झालेले असले आणि अमेरिकेच्या राजकीय हितसंबंधांचा भाग म्हणून जरी या राष्ट्राची निर्मिती झालेली असली तरी इस्त्राईलचा इतिहास अमेरिकेपेक्षा फार जुना म्हणजे ५ ते ७ हजार वर्षांचा आहे. त्या तुलनेत अमेरिकेचा इतिहास जेमतेम ३०० ते ३५० वर्षांचा आहे. भारत आणि इस्त्राईल या दोन्ही देशांमध्ये एक प्रमुख साम्य आहे ते म्हणजे दोन्ही देश गरज इस्त्राईलकडून भागविली जाते. हा शेतीमाल निर्यात करुन जे मोठे परकीय चलन मिळते त्यावर इस्त्राईलची गुजराण व इतर विकासाची कामे राबविली जातात. संरक्षण साहित्याची निर्मिती, उत्पादन व विक्री हाही त्यांच्या व्यापाराचा महत्त्वाचा भाग आहेच. पण आपल्या दृष्टीने शेतीविषय महत्त्वाचा आहे.

त्या क्षेत्रात त्यांनी जाणीवपूर्वक संशोधन करुन खूप मेहनतीने नवनवे तंत्रज्ञान विकसीत केले आहे. जे आपल्या हवामानाला व वातावरण आणि नैसर्गिक परिस्थितीला अनुकूल होणारे आहे. दोन्ही देशांचे साम्य शोधून त्यांच्यामध्ये सहकार्याचा करार व्हावा यासाठी मागील १० वर्षांपासून म्हणजे १९८३ पासून मी प्रयत्न करीत होतो. परंतु भारत आणि इस्त्राईल यांचे



इस्त्राईल येथील नानदान कंपनीसोबत जैन इरिगेशनचे अधिग्रहण प्रसंगी.

पाण्यासाठी आसुसलेले व त्रासलेले आहेत. शेती हा दोघांच्याही जीवनाचा मुख्य आधार आहे. फरक इतकाच आहे की भारतात मुख्यत्वे शेती केली जाते ती देशातल्या लोकांची अन्नधान्याची व दैनंदिन जीवनाला लागणाऱ्या भाजीपाला, फळे, फुले यांची गरज भागविण्यासाठी. इस्त्राईलमध्ये शेतीमालाचे आणि त्यातही प्रामुख्याने फळे, भाजीपाला, फुले यांचे उत्पादन केले जाते ते निर्यातीचे उद्दिष्ट समोर ठेवून. अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांची विशेषतः फळे, भाजीपाला, मांस यांची मोठी राजनैतिक संबंध प्रस्थापित झालेले नसल्यामुळे मोठी अडचण येत होती. फारसा संवाद होत नव्हता. त्यामुळे व्यापार व सहकार्याची गोष्ट तर दूरच होती. पण दोन्ही राष्ट्रांना एकमेकांबद्दल ओढा वा, आपुलकी आतून वाटत होती. प्रत्यक्षात रशियन साम्राज्याचा व राजकारणाचा आपल्यावर प्रभाव असल्यामुळे आपण इस्त्राईल देशाला मान्यता देत नव्हतो. अखेरीस जागतिक परिस्थिती व चित्र बदलले. १९९० साली आपल्या देशानेही खुली व मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. गॅट करारावर आपण सही

केली. जागतिक अर्थव्यवस्थेत मुक्त बाजारपेठी वारे वाहू लागले. या सर्वांचा परिणाम म्हणून जानेवारी १९९२ मध्ये भारत आणि इस्त्राईल यांच्यात राजनैतिक संबध निर्माण झाले. या संबंधांची फलश्रुती या भावनेतून आपण या शिक्षण व प्रशिक्षण केंद्राकडे पाहिले पाहिजे.

**प्रश्न : या केंद्राकडून आपल्याला कशा प्रकारचे सहकार्य मिळणार आहे? त्याची कितपत आवश्यकता आहे?**

**भवरलालजी** : इस्त्राईलने शेतीच्या क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या विषयांमध्ये उदा.



पाणी व्यवस्थापन, सिंचनाचे साहित्य म्हणजे ठिबकच्या नळ्या, ड्रीपर, फिल्टर, फळबागांची उभारणी, ग्रीनहाऊस मध्ये भाजीपाला व फुलांचे उत्पादन, संकर करुन नव्याने बनविलेली बियाणे व रोपे, ऊतीसंवर्धन पद्धतीने बनविली जाणारी रोपे व त्याचे तंत्रज्ञान आणि सौर उर्जेचा शेतीतील व वीज निर्मितीसाठी वापर कसा करायचा या संदर्भात सहकार्य करण्याचे

**इंडो-इस्त्राईल कृषी शिक्षण आणि प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन १९ डिसेंबर, १९९३ रोजी जळगावच्या जैन हिल्सवर इस्त्राईलचे कृषिमंत्री याकोब सूर आणि महाराष्ट्राचे कृषीमंत्री हर्षवर्धन देशमुख यांच्या शुभहस्ते आणि बारामती कृषिविकास प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष डॉ. आप्पासाहेब पवार, इस्त्राईलचे भारतातील राजदूत श्री. डोरेक, नामवंत द्राक्ष बागायतदार विजयराज ब्रम्हेचा, आमदार श्री. सुरेशदादा जैन, श्री. अरुणभाई गुजराथी, जैन इरिगेशनचे संस्थापक डॉ. भवरलाल जैन आणि कवि ना. धों. महानोर यांच्या उपस्थिततीत झाले होते. या केंद्राच्या उद्घाटनाच्या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुधीर भोंगळे यांनी डॉ. भवरलाल जैन यांची २७ वर्षांपूर्वी एक विशेष प्रदीर्घ मुलाखत घेतली होती. ही मुलाखत आजही किती ताजी, टवटवीत आणि भविष्याचा वेध घेऊन भवरलालजींचे द्रष्टेपण दाखविणारी आहे हे वाचल्यानंतर आपल्या लक्षात येईलच. प्रश्नोत्तराच्या स्वरुपात झालेली ही मुलाखत त्याच रुपात आपल्यासमोर येथे ठेवित आहोत.**

मान्य केले आहे. प्रामुख्याने हे सहकार्य तांत्रिक स्वरुपाचे असले तरी यासाठी जे तज्ज्ञांचे मार्गदर्शन आवश्यक आहे त्याकरिता तंत्रज्ञानाचा दीर्घ अनुभव असलेले तज्ज्ञ लोक पुरविण्याचे त्यांनी मान्य केले आहे. जैन फाऊंडेशनशी त्यांनी हा जो करार केलेला आहे तो आपल्या देशाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. प्रत्येक विषयातले तज्ज्ञ लोक पुरविण्याचे त्यांनी मान्य केले आहे. हे यासाठी महत्त्वाचे आहे की संशोधन ही खूप वेळखाऊ व खर्चिक प्रक्रिया आहे.



एखादी जात किंवा वाण विकसीत करुन त्याच्या सर्व चाचण्या घेईपर्यंत किमान १०-२० वर्षांचा कालखंड जातो. इतका काळ थांबणे व वाट पाहणे आता कोणालाच शक्य नाही. कारण खुल्या व मुक्त बाजारपेठेमुळे जागतिक स्पर्धा जीवघेणी झालेली आहे. शेलारमामांनी जसा सिंहगडावरचा दोरखंड कापला होता आणि मावळ्यांना लढा नाही



चर्चासत्राचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना इस्त्राईलचे कृषीमंत्री याकोब सूर, महाराष्ट्राचे कृषीमंत्री हर्षवर्धन देशमुख, डॉ. भवरलाल जैन, सुरेशदादा जैन, कवी. ना. धों. महानोर व इतर मान्यवर.

तर मरा असा जो संदेश दिला होता तशीच अवस्था पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी आपली करुन ठेवली आहे. त्यामुळे जागतिक स्पर्धेतले शेतीमाल निर्यातीचे युद्ध जर लढून जिंकायचे असेल तर नवीन तंत्रज्ञान स्वीकारून उत्पादन व उत्पादकता वाढविणे अगत्याचे झाले आहे. त्यासाठी या सहकार्याच्या कराराला महत्व आहे. एखाद्या कंपनीचा किंवा जैन इरिगेशनचा माल विकण्यासाठी हे केंद्र काढलेले नाही. इतक्या मर्यादित व संकुचित भावनेतून त्याकडे पाहू नका. पहिल्यांदा इस्त्राईल राष्ट्राने एका कंपनीच्या खासगी ट्रस्टशी जो करार केलेला आहे त्यामागे खूप कष्ट, मेहनत, प्रामाणिकपणा, तळमळ, सामाजिक बांधिलकी व शेतकऱ्यांच्या उन्नतीच्या आसेचे पाठबळ उभे आहे. या केंद्रामधून कृषि विद्यापीठातले लोक, कृषि खात्यातले कर्मचारी, खासगी कंपन्यांचे लोक आणि शेतकरी या सर्वांना मार्गदर्शन केले जाणार आहे. आमच्या कंपनीतल्या कर्मचारी व तांत्रिक प्रशिक्षणार्थींची संख्या जशी खूप मोठी आहे तसे तंत्रज्ञान व शास्त्रही रोज नव्याने बदलते आहे व विकसीत होत आहे. नवनवीन संशोधनाची त्यात भर पडते आहे. त्यामुळे या संशोधन व तंत्रज्ञानाचा तातडीने प्रसार व प्रचार करणे अगत्याचे होऊन बसणार आहे. या कामात शेतकऱ्यांनी स्वतः होऊन पुढे आले पाहिजे व नवनवीन गोष्टीचा स्वीकार करण्यात रस दाखविला पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे.

आता राहता राहिला प्रश्न या सहकार्याच्या आवश्यकतेचा. आजही आपला भारत देश जगात शेतीच्या क्षेत्रात अप्रगत व मागासलेला देश म्हणूनच ओळखला जातो. आपली प्रत्येक पिकातली उत्पादन क्षमता अत्यंत कमी आहे. त्यामुळे आपला उत्पादन खर्च अधिक राहून बाजारात स्पर्धा करणे आपल्याला अवघड होते. आपल्याला शेतीमालाचे उत्पादन व उत्पादकता वाढवून उत्पादन खर्च अत्यंत कमी म्हणजे खालच्या पातळीवर न्यायचा आहे. तसे करण्यात आपण यश मिळवू शकलो तर जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी आपण उभे राहू शकू. हे ताठ मानेने बाजारात उभे राहण्याकरिता सहकार्याची आवश्यकता आहे.

**प्रश्न : शेतीमालाच्या निर्यातीमध्ये आज काय अडचणी आहेत?**

**भवरलालजी** : आपल्या सर्वांना माहिती आहे की शेतीमाल हा नाशवंत असतो. तो फार काळ साठवून ठेवता येत नाही. साठविण्यासाठी वातानुकुलित गोदामे, प्रिकुलींग यंत्रणा,

कुलिंग चेन, रेफ्रिजरेटेड व्हॅन्स, चांगले रस्ते व दळणवळणाच्या सुविधा आवश्यक असतात. ज्या ठिकाणी कच्च्या मालाचे उत्पादन होते त्याच्या जवळच शक्यतो साठवणुकीची व्यवस्था हवी. अन्यथा परत वाहतुक खर्च वाढतो आणि या वाहतुक व माल हाताळणीमध्ये मालाचे काही प्रमाणात तरी नुकसान होते. भारतातल्या खेडोपाडी आणि शेती असलेल्या अंतर्गत व डोंगराळ दऱ्यांच्या भागात जिथे पायी चालायला धड रस्ता नाही तिथे शेतीमाल निर्यात व साठवणुकीसाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर केव्हा व कोण उभे करणार? शेतीमालाच्या निर्यातीसाठी विमान, बोटी, कस्टम तपासणी व परवानगी, रस्ते वाहतुक, बंदरे व विमानतळांवर कोल्ड स्टोअरेजेस, रेल्वे वॅगन्स या मुलभूत सोयीसुविधा उभ्या कराव्या लागतील. हे विषय सुटल्याशिवाय कोणताही शेतीमाल व्यवस्थित पोहचू शकणार नाही. माल कसा आहे हा प्रश्न शेवटी येतो. चांगले इन्फ्रास्ट्रक्चर असेल आणि त्याचा पुरेपूर काटेकोरपणे वापर केला असेल तर मालाची प्रत व गुणवत्ता खराब होणार नाही. त्याचा दर्जा टिकून राहिल. शक्यतो नं. १ चा सर्वोत्तम गुणवत्तेचाच माल निर्यात होऊ शकतो. नं. २ ते नं. ४ पर्यंतचा माल देशांतर्गत बाजारपेठेतच विकावा लागतो. त्यातही नं. ३ आणि नं. ४ चा माल प्रक्रियेसाठी वापरीत असतात. परंतु चांगल्या मोठ्या कंपन्यांना दर्जेदार मालही प्रक्रियेसाठी खरेदी करावा लागतो आणि असा माल निघण्याचे प्रमाण कमी असते. जास्तीत जास्त माल निर्यातयोग्य कसा निघेल यासाठी शेतकऱ्यालाही खूप मेहनत घ्यावी लागते. त्यासाठी निसर्गाची साथही असावी लागते. हल्ली नैसर्गिक संकटांपासूनही शेतीमालाला मोठा धोका पोहोचतो आहे. त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठीही काही व्यवस्था उभी करावी लागणार आहे. ती कोण, कशी व कधी करणार हाही प्रश्न अजून अनुत्तरीतच आहे.






चर्चासत्रानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या पुस्तिकेचे डॉ. आप्पासाहेब पवार प्रकाशन करताना. शेजारी उजवीकडून महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष मामासाहेब खापरे, विजयराज ब्रह्मेचा, कवी ना. धों. महानोर आणि सुरेशदादा जैन



जनुकीय तंत्रज्ञानाचा वापर करून भाताच्या रोपात पाहिजे तो जीन घालून अ व्हिटॅमिन सत्त्व असलेली रोपे बनविण्यात येतात.

सुरुवातीला मला असे वाटायचे प्रत्येक जिल्ह्यात शीतगृहे झाली पाहिजेत. पण ज्या पद्धतीने शेतीमालाचे आणि विशेषतः फळे व भाजीपाल्याचे उत्पादन वाढते आहे ते पाहता एकेका तालुक्यात दोन-तीन शीतगृहसुद्धा कमी पडतील असे वाटू लागले आहे. एकटा शेतकरी वैय्यक्तिकरित्या ही शीतगृहे व इन्फ्रास्ट्रक्चर उभे करु शकणार नाही. सरकार, विविध फळपिकांच्या संघटना, शेतकरी उत्पादक गट, या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कंपन्या व सहकारी संस्था या सर्वांनी एकत्र येऊन शेतीमाल निर्यात व प्रक्रियेकरिता कंपन्या उभ्या केल्या पाहिजेत. त्यांना अत्यंत नाममात्र दराने वित्तीय संस्था व बँकांनी दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा केला पाहिजे. सरकारने शेतीच्या दराने वीजबील आकारले पाहिजे. वर्षातले किमान ३०० दिवस तरी ते कोल्ड स्टोअरेज वापरात आले पाहिजे आणि प्रक्रिया उद्योगातली मशिनरी उपयोगात आली पाहिजे तरच आर्थिकदृष्ट्या हा व्यवसाय परवडू शकेल. यासाठी प्रक्रिया उद्योगातली यंत्रसामुग्री ही बहुपयोगी असली पाहिजे. थोडेफार बदल करुन तो प्लॅन्ट वेगवेगळ्या पिकांकरिता चालविता आला पाहिजे.




**प्रश्न : शेती व्यवसायात सरकारचा सहभाग किती असावा?**

**भवरलालजी** : शेतीमालाची व्यवस्थित विल्हेवाट लावण्यासाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर आवश्यक असते त्याची उभारणी करण्यात सरकारचा सहभाग असावा. मात्र प्रत्यक्ष व्यापार व धंदा करण्यात किंवा उद्योग चालविण्यात सरकारचा सहभाग नसावा. सरकारने जे उद्योग काढले आणि चालविले त्यांची काय अवस्था झाली आहे हे आपण उघड्या डोळ्यांनी भारतातच काय जगातील अनेक देशात पाहतो. जे सरकारच्या मालकीचे ते कोणाच्याच मालकीचे नाही अशा प्रकारची भावना

लोकांमध्ये वाढीला लागलेली आज तरी सर्वत्र पाहायला मिळते. त्यामुळे त्या उद्योग वा संस्थेबाबत लोकांना एवढेच नव्हे तर तिथे काम करणाऱ्या कामगारांनादेखील आपुलकी ममत्व व प्रेम असत नाही. ही दुभती गाय आहे या भावनेतून तिच्याकडे पाहून जेवढे लुटता येईल, ओरबडता येईल तेवढा प्रयत्न बहुतांश लोक करताना दिसतात. अशा स्वार्थी व भ्रष्ट प्रवृत्तीमुळे उद्योगाच्या हिताचे निर्णय घेतले जात नाहीत. त्यामुळे त्याचे मरण लवकर ओढवते. म्हणून माझे तर स्पष्ट मत आहे सरकारने उद्योग चालविण्याचे कोणतेच काम करु नये. सरकारी उद्योग शेवटी रसातळालाच जातात हा सार्वत्रिक अनुभव आहे.

आजकाल नोकरशाही तर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचारी झाली आहे. पैसे दिले तरी अधिकारी त्यांच्या मनमानी पद्धतीनेच वागतात. उद्योजकाच्या कामाची तत्परता व घाई समजून घ्यायला नोकरशाही तयार नसते. कारण उद्योग उशीरा सुरु झाला तरी त्याचा बोजा वा परिणाम, नुकसान याच्याशी त्याला काहीही देणेघेणे नसते. कारण त्या व्यवसायाशी त्याचा सुताइतकाही संबंध नसतो. त्यामुळे प्रेम, जिव्हाळा या गोष्टी खूप दूरच आहेत. पण ज्याने व्यवसाय सुरु केला आहे त्याने कर्ज काढून भांडवल आणलेले असते. व्याजाचे मिटर चालू असते. व्याजाला झोपच नसते. ते सतत वाढत जाते. ते वाढू नये व लवकर कर्ज फेडता यावे ही उद्योजकाची तळमळ व प्रयत्न असतो. कोणताही उद्योजक कर्जबाजारी होण्यासाठी व्यवसाय उभा करीत नाही. तथापि उद्योजक आणि नोकरशाही यांच्या भावनांचा अचूक मेळ बहुतांश वेळेला बसतच नाही. उद्योजक काही परवाना मागायला आला की आपल्या हाती कापायला बोकड आला अशीच अनेकांची भावना असते. त्यामुळे देण्याघेण्याचा व्यवहार झाल्याशिवाय सुरुवातीला परवाना मिळणेच दुरापास्त होते. सगळे अधिकारी व कर्मचारी भ्रष्ट असतात असे मी म्हणत नाही. याला काही अपवाद निश्चित असतील. पण सार्वत्रिक अनुभवांचा व निरनिराळ्या उद्योजक व व्यावसायिकांच्या अनुभवांचे सार एकत्रितपणे काढण्याचा प्रयत्न केला तर निघणारा निष्कर्ष उद्योगांच्या वाढीला फारसा खुलेपणाने व मोकळ्या मनाने चालना देणारा आहे असा काही निघत नाही.





इस्त्राईलमध्येही शेतीमाल निर्यातीसाठी 'कारमेल' नावाची जी कंपनी काढलेली आहे त्यात सरकारचे भागभांडवल ४९ टक्के आहे आणि शेतकऱ्यांचे भागभांडवल ५१ टक्के आहे. शेतकऱ्यांच्या मालकीच्या कंपनीची विमाने व बोटी आहेत. इस्त्राईलमध्ये दर अडीच मिनिटाला एक विमान माल घेऊन वेगवेगळ्या देशात जाते. पण या मालाची काढणी, जमवाजमव (म्हणजे कंटेनर भरण्याइतका एकसारखा माल गोळा करणे), प्रिकूलिंग, बांधणी या सगळ्यांना किमान दोन दिवस लागतात. शेतकरी जीव तोडून, आत्मा ओतून माल तयार करतो. या मालाची चांगल्या दराने विक्री होऊन आपल्याला रास्त किंमत मिळावी व मोठा नफा व्हावा ही शेतकऱ्याची अपेक्षा असते. ती चुकीची आहे असे नाही. कोणताही माणूस शेती किंवा अन्य कोणताही व्यवसाय करतो तेव्हा त्यामागे नफा मिळविणे हीच प्रेरणा असते. ही प्रेरणा नसेल तर तो व्यवसायच उभा राहणार नाही. पण या प्रेरणेशी अधिकाऱ्यांची बांधिलकी नसते किंवा त्याबद्दल त्यांना तसूभरही प्रेम नसते. ही प्रेरणाच ते ध्यानात घेत नसल्यामुळे सर्व ठिकाणी अडवणुकीचा कार्यक्रम व्यापक स्वरुपात उभा राहताना दिसतो. हे शेतकऱ्यांचे मोठे दैन्य आणि दुःख आहे. आणि विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे यातले बहुतांश अधिकारी ही शेतकऱ्यांचीच मुले असतात. शेतकरी कुटुंबातूनच ती आलेली असतात. तरी देखील ती शेतकऱ्यांच्या भावना का समजून घेत नाहीत हा बऱ्याचदा मला स्वतःला पडलेला प्रश्न आहे.

**प्रश्न : इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी करण्यासाठी सरकारशिवाय अन्य काही मार्ग उपलब्ध आहेत का व मुख्यमंत्री शरद पवार यांनी फेब्रुवारी १९९३ मध्ये इस्त्राईलच्या ॲग्रीटेक प्रदर्शनाला भेट देवून आल्यानंतर मुंबईच्या न्यूझीलंड होस्टेल व कोयना धरणावर इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीसाठी ज्या बैठका घेतल्या त्यांचा काही उपयोग होईल असे वाटते का?**

**भवरलालजी** : वाहतुकीची सुविधा हा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्याने उत्पादित केलेला शेतीमाल विमानतळ,



बंदरे, रेल्वे स्टेशन आणि देशांतर्गत मोठ्या बाजारपेठांपर्यंत व्यवस्थित व कोणतेही नुकसान न होता लवकरात लवकर कसा पोहोचविता येईल या दृष्टीने अत्याधुनिक वाहतुक व्यवस्था सर्वप्रथम उभी करणे गरजेचे आहे. रस्त्याने ट्रक व गाड्यांमधून माल वाहून नेणे अत्यंत जिकीरीचे व कठीण झाले आहे. फुटलेले रस्ते व मोठमोठे खड्डे यामुळे पॅकिंग केलेल्या मालाची बरीच हेळसांड होते व माल एकमेकांवर घर्षण होऊन त्याचे नुकसान होते. बाजारात पोहोचेपर्यंत त्याची गुणवत्ता कमी होते. यासाठी अगोदर पक्के सिमेंटचे दीर्घकाळ टिकतील असे रस्ते बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. तो बीओटी तत्त्वावर (बांधा–वापरा–हस्तांतर करा) राबविता येईल. रस्ते चांगले असतील तर लोक खुषीने टोल टॅक्स द्यायला तयार होतील. परदेशातली टोलपद्धत आपल्याला उचलता येईल. गाडीवर टिकटवलेल्या स्टीकरवर कॅमेऱ्याचा फ्लॅश पडला की गाडी मालकाच्या बँक खात्यातून टोलची रक्कम काढून घेतली जाईल. त्यासाठी गाड्या थांबवून रांगा लावण्याची काहीही आवश्यकता नाही.

रस्त्यांपेक्षाही रेल्वे वाहतुक अधिक चांगली, सोयीची व कमी खर्चाची आहे. पण त्यासाठी रेल्वे स्टेशन जवळ हवे आणि रेल्वेनेही माल वाहतुकीसाठी पाहिजे त्या वेळी पुरेशा वॅगन्स (डबे) उपलब्ध करुन द्यायला हवेत. पण वॅगन्सची सुविधा रेल्वे व्यवस्थितपणे पुरवित नाही. जळगाव जिल्ह्यातून केळी पाठविण्यासाठी आम्ही खूप वर्षांपासून रेल्वेकडे सारखा पाठपुरावा करतो आहे. पण त्यांचा प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नाही. रेल्वे मंत्रालयाचे धोरण सतत बदलत राहते. रेल्वेमंत्री बदलला की प्राधान्यक्रम बदलतो. खरे तर शेतीमाल वाहतुक व निर्यातीसाठी वेगळी बंदरे व विमानतळे विकसीत केली पाहिजेत. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव येथे स्वतंत्र विमानतळ करून ती मुंबईशी जोडली पाहिजेत. थेट माल मुंबईच्या विमानतळावर गेला पाहिजे. वाहतुकीचे विकेंद्रीकरण जोपर्यंत होत नाही तोवर व्यवस्थेत सुधारणा होणार नाही. संघटित असलेले क्षेत्रच ही व्यवस्था उभी करण्याचे काम उत्तमरीत्या करु शकते. व्यक्तिगत शेतकऱ्यांना हे काम करण्याला मर्यादा आहेत. यासाठी सरकारने या कामाकरिता संघटित क्षेत्राला प्रोत्साहन दिले पाहिजे. इतके दिवस झाले सरकार, सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ या क्षेत्रात काम करताहेत. १९६० पासून कृषी उत्पन्न बाजार समित्याही काम करताहेत. बोदवडची बाजारसमिती तर ब्रिटिश काळापासून कार्यरत आहे.






खानदेशातले अनेक बाजार हे 'कॉटन मार्केट' म्हणूनच ओळखले जायचे. खानदेशातला कापूस मुंबई बंदरापर्यंत वाहून नेण्यासाठी ब्रिटिशांनी रेल्वेलाईन टाकली. त्यात आपण किती सुधारणा केली? शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने काम करायचे असेल तर राज्यकर्त्यांनी आपली विचारधारा व काम करण्याची पद्धत, मनोवृत्ती बदलली पाहिजे. सहकार कितीही चांगला असला तरी त्यात राजकारण शिरलेले असल्यामुळे त्यात निकोप स्पर्धा व सेवाभाव राहात नाही. सरकारी संस्थाही आता राजकारणाचे अड्डे बनल्यामुळे नुसती तत्वे व ध्येये चांगली असून उपयोगी नाही. त्यात ध्येयवादी व निःस्वार्थी वृत्तीने काम करणारी माणसे संस्थांमध्ये कुठे आहेत? तशी माणसे असतील तरच संस्था चांगल्या चालतील. व्यवसाय व व्यापारात राजकारण शिरले की त्याचे वाटोळेच होणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यामुळे धंदा वा व्यवसाय हा राजकारणापासून दूरच असला पाहिजे. सहकार क्षेत्र हे व्यवसायाची शुद्धता व चिरंतन सातत्य टिकवू शकणार नाही. सरकार आणि सहकार या दोघांनीही शेतीमाल निर्यात व प्रक्रियेला फार मोठी गती येईल व संधी प्राप्त होईल असे वाटत नाही. त्यासाठी खाजगी उद्योजक आणि शेतकरी यांच्यामध्ये विश्वासाचे व परस्पर सहकार्याचे नाते निर्माण होऊन 'कराराची शेती' (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) वाढली पाहिजे. ही करार शेती वाढवित नेणे हाच पुढचा विकासाचा मार्ग असला पाहिजे.

शेतकऱ्यांनीसुद्धा लोकांना जे पाहिजे त्याचेच उत्पादन केले पाहिजे. रोपे किंवा बियाणे लावण्यापूर्वी उत्पादित झालेल्या मालाची मी कशी व कुठे विल्हेवाट लावणार आहे याचा विचार करून त्याप्रमाणे नियोजन केले पाहिजे. माल निर्यात करावयाचा असेल तर कंटेनर भरेल इतका माल एकावेळी उत्पादित झाला पाहिजे किंवा जवळच्या परिसरातील शेतकऱ्यांकडून जमा करता आला पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांना संघटितपणे आपले सर्व मतभेद, हेवेदावे, राजकीय गटबाजी विसरुन एकत्रित येऊन खांद्याला खांदा लावून काम करावे लागेल.

मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी इस्त्राईलहून आल्यानंतर ज्या बैठका घेतल्या त्यात शेतीमाल निर्यातीसाठी इस्त्राईलमधील 'ॲग्रेस्को'च्या धर्तीवर महाराष्ट्रातही शेतकरी व सरकार मिळून कंपनी काढण्याचे जाहीर केले आहे. हा निश्चितच शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय आहे. तसेच त्यांनी कित्येक पिकांचे उत्पादनाचे क्षेत्र लक्षात घेऊन निरनिराळे फळपिकांचे निर्यात झोन जाहीर केले आहेत. पण नुसते झोन जाहीर करुन प्रश्न सुटणार नाही. प्रत्यक्षात प्रत्येक पिकाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करावे लागेल. पिकांच्या जाती शोधून काढून त्या वाढवाव्या लागतील. रूटस्टॉकचे संशोधन करावे लागेल.



माझ्या वाचनात आले की न्यूझीलंड होस्टेलमध्ये झालेल्या बैठकीत कोणीतरी निर्यात सल्लागाराने असे सांगितले की विदर्भातले संत्रे हे प्रक्रियेसाठी व निर्यातीकरिता योग्य नाही कारण ते मॅन्डरीन वर्गातले असून त्याचा टिकण्याचा कालावधी (किपींग क्वालिटी) फारच कमी आहे. त्यामुळे विदर्भातील संत्रा लागवड बदलून नवीन व्हरायटी लावाव्या लागतील. काही



राजकीय नेत्यांनी याला विरोध केला. पण माझे मत विचाराल तर तो निर्यात सल्लागार जे बोलला त्यात काहीही चुकीचे नाही. जगामध्ये मॅन्डरीन वर्गातल्या संत्र्याचा ज्यूस कोणी काढीत नाही. सर्व ज्यूस हा सायनान्सीस वर्गातल्या व्हॅलेंशिया, नेव्हल, नटाल, हॅमलिन, पेरा, वेस्टीन यांसारख्या जातींचा काढला जातो. त्यामुळे या जाती परदेशातून आणून आपल्या विदर्भात वाढवाव्या लागतील. यासाठी लोकांची मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे. संत्र्याच्या आज उभ्या असलेल्या बागेतील झाडांवरही या व्हरायटींचे कलम करता येईल पण त्यासाठी शेतकरी उत्सुक असला पाहिजे.





नाही. मागील आठ हजार वर्षांत शेतकरी अजूनही मजबुतीने उभा राहिलेला नाही. केवळ व्यवहार, नफा, प्रतिष्ठेसाठी धंद्यात पडणे म्हणजे तो धंदा न चालण्यासारखेच आहे. शेती हा काही इतर उद्योगांसारखा धंदा नाही. त्याचे संपूर्ण नियंत्रणही आपल्या हाती नाही. कॅश फ्लो, नफा–तोटा हे विषय शेतीला लागू होत नाहीत. कायम नफाच होईल किंवा कायम तोटा होईल असे छातीठोकपणे कुणी सांगू शकत नाही. पुढचा माणूस काय विचार करेल व कसे नुकसान



**प्रश्न : शेती हा व्यवसाय केव्हा यशस्वी होईल? त्यासाठी सरकारकडून काय अपेक्षा करता?**

**भवरलालजी** : शेती या विषयाकडे मी केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहात नाही. शेवटी शेती हा विषय निसर्गाचा आहे. कितीही वैज्ञानिक प्रगती झाली तरी निसर्गाच्या मनावरच शेतीचे बरेवाईट होणे अवलंबून राहणार आहे. त्यामुळे निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा त्याच्याशी मैत्री करीत व हातात हात घालून पुढे जाण्यातच शेतकऱ्यांचे हित व कल्याण आहे. काळ्या आईची ज्यांना इमानेइतबारे सेवा करायची आहे व ज्यांची शेती आणि शेतकऱ्यांशी बांधिलकी आहे त्यांनीच या व्यवसायात पडले पाहिजे. नफा मिळविणे आणि शेतकऱ्यांना लुटत राहणे हेच उद्दिष्ट समोर ठेवून ज्या कंपन्या शेती क्षेत्रात उतरतील त्या फार काळ टिकणार नाहीत. प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि बांधिलकीशिवाय यशस्वीता मिळणारच नाही. प्रत्येकाने या क्षेत्रात उतरुन काम करण्यासारखी परिस्थिती



करेल याचा अंदाजच बांधता येत नाही. त्याने नुकसान केले की आपला त्याच्यावरचा विश्वास कमी होतो. आज शेतकऱ्याचा कोणत्याही दलाल, अडते, व्यापारी, उद्योजक यांच्यावर विश्वासच नाही. सारेजण आपल्याला लुबाडायला व फसवायलाच बसले आहेत अशी त्याच्या मनाची ठाम धारणा झालेली आहे. हे चित्र फारसे चांगले नाही. ते प्रत्येकाने बदलावे लागेल.



शेतीसाठी जी साधनसामुग्री, यंत्रसामुग्री व अद्ययावत तंत्रज्ञान लागते ते बऱ्याचदा आपल्याला आयात करावे लागते. सरकारने या मालावरील आयात ड्युटी अत्यंत कमी ठेवली पाहिजे. काही गोष्टी करातून वगळल्या पाहिजेत. अमेरिका, हाँगकाँग व इतर प्रगत देशात करांचे प्रमाण आपल्यापेक्षा खूप कमी आहे. विक्रीयोग्य मालावर जो कर लावला जातो त्यापेक्षा कच्च्या मालावरील कराचा दर कमी असला पाहिजे. आपल्याला व्यापार वाढवायचा आहे की देशातले उद्योगधंदे वाढवायचे आहेत याचे उत्तर कोण देणार? कच्च्या मालावरील ड्युटी ही पक्क्या मालापेक्षा कमी असली तरच कारखानदारी वाढेल. सरकारने असे जाहीर करावे की जिथे पक्क्या मालापेक्षा



पूर व अतिवृष्टीमुळे पिकांचे सातत्याने नुकसान होणे हे आता नवीन राहिलेले नाही.



कच्च्या मालावर ड्युटी अधिक असेल तिथे ती कमी करु व लोकांना पैसा परत देवू. शेतकऱ्यांचा विकास हाच केंद्रबिंदू ठेवून धोरण व निर्णयांची उतरंड सरकारने रचली पाहिजे. तसे केले तरच भारत हा शेतीप्रधान देश आहे असे म्हणण्याला काही अर्थ प्राप्त होईल. अन्यथा 'मोले घातले रडाया' अशीच अवस्था शेतकऱ्यांची होईल.




# सिनाडको प्रशिक्षण व चर्चा समारंभ

आदरणीय व्यासपीठ, शेतकरी बंधू भगिनींनो!

सुरेशदादा, शरद पवार आणि माझे संबंध आपल्याला माहिती आहेत, परंतु आप्पासाहेब पवार आणि माझे संबंध आपल्याला माहीत नसावेत. १९८४-८५ मध्ये आप्पासाहेब फ्रेस्नोमध्ये एक प्रदर्शन बघायला गेले होते. तेथे मी सुद्धा होतो. तेथपासून ठिबक सिंचनाचा आरंभ झाला. 'भारतात ठिबक सिंचन आले पाहिजे. ठिबक सिंचन ही काळाची गरज आहे, भवरलालजी, तुम्ही जर हे करणार असाल तर त्यापेक्षा चांगली गोष्ट घडणार नाही.' हा आप्पासाहेबांचा सल्ला होता. त्यांच्या सल्ल्यानुसार वागलो, वाटचाल केली आणि पाच वर्षांनंतर आप्पासाहेब येथे आले याचा मला फार आनंद वाटला. मोठ्या पुढाऱ्यांची शाबासकी मिळणे यापेक्षा आप्पासाहेबांची शाबासकी मिळणे ही विशेष बाब आहे, असे मी मानतो. जे हाडाचे शेतकरी आहेत अशा तीन व्यक्तींना यायची विनंती केली होती. या तीनही व्यक्ती आल्या आहेत. आप्पासाहेब, श्री. ब्रह्मेचा आणि ना.धों. महानोर आहेत. ना.धों. महानोर येणारच होते, कारण ते या जैन फाउण्डेशनचे विश्वस्त आहेत. आप्पासाहेबांना फोन केला. ते येथे यायला 'हो' म्हणाले. माझ्या मनात शंका होती, तब्येतीच्या दृष्टीने त्यांना येथे येणे शक्य होईल का? परंतु आपण अगदी ठणठणीत आहोत, हे उत्तर मला त्यांच्याकडून मिळाले. मन भरून आले. आज कार्यक्रम संपल्यावर परत जायचे आहे असे ते म्हणत आहेत. असे जाणे म्हणजे वेडेपणाचा विचार आहे. मी आप्पासाहेबांना म्हणालो की, 'आप्पासाहेब आपण आता बत्तीस पस्तीस वर्षांचे नाहीत. निदान वयाकडे बघून तरी विचार करा आता आपल्याला काही जाता येणार नाही. आमच्यावर मेहेरबानी करा. 'ते शक्य होणार नाही. फार दिवसांतून आला आहात. कमीतकमी दीड दोन दिवस तरी राहिले पाहिजे'. एवढ्या प्रेमाने आप्पासाहेबांनी या उद्योगाकडे बघितले.'

परवा आम्ही नाशिकला श्री. ब्रह्मेचा यांच्या सत्कारासाठी गेलो होतो. हा सत्कार म्हणजे त्यांनी केलेल्या मौलिक कामाची पावती देण्यात आली. शासन जे काही कमीअधिक चांगले काम करते त्यातले ते एक चांगले काम आहे. ते सगळ्यांनी सांगितले. येथे ब्रह्मेचा आले, त्यांचेही मी आभार मानतो. थोड्याच वेळात येथे विदेशी पाहुणे येतील. मी त्यांना घ्यायला जात असल्याने आपल्या या चर्चासत्रात मला सहभागी होत येणार नाही, परंतु त्या पाहुण्यांना मी येथे घेऊन येतो. आपल्याला त्यांच्याशी चर्चा करता येईल.




**जळगावच्या जैन हिल्सवर १८ डिसेंबर १९९३ रोजी सिनाडको प्रशिक्षण व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. इस्राईलचे कृषीमंत्री व महाराष्ट्राचे कृषीमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या या चर्चासत्रात जैन इरिगेशनचे संस्थापक डॉ. भवरलाल जैन यांनी केलेले हे भाषण.**

ज्या देशातील शेतीसाठी ७० टक्के लोकसंख्या काम करते आहे, त्या देशात शेती आधुनिकीकरणाला पर्याय नाही. केवळ आधुनिक तंत्रज्ञान आणून उपयोग नाही, तर ते या इथल्या सामान्य शेतकऱ्यांना समजले पाहिजे, उमजले पाहिजे ही मूलभूत गरज लक्षात घेऊन श्री. भवरलाल जैन यांनी इस्त्रायल येथील कृषितज्ज्ञांसोबत 'सिनाडको' नावाची प्रशिक्षण संस्था जळगाव येथे सुरू केली. त्यातील एका प्रशिक्षण कार्यक्रमातील त्यांचे हे भाषण. त्यात त्यांचा हाडाच्या कृषितज्ज्ञांविषयीचा जिव्हाळा कळतो, गॅट कराराची चाहूल लागते आणि डंकेल प्रस्तावाविषयी साधक-बाधक चर्चा होते. आधुनिक शेतीसाठी ते केवळ इस्त्रायलशी वेगवेगळे करार करून थांबत नाहीत, तर ज्यांच्यासाठी आणले त्या शेतकऱ्यांकडून, कृषी अधिकाऱ्यांकडून त्याची बाराखडीही गिरवून घेतात.




जळगावच्या जैन हिल्सवर झालेल्या सिनाडको केंद्राच्या उद्‌घाटनप्रसंगी व्यासपीठावर डावीकडून सर्वश्री सुरेशदादा जैन, भवरलाल जैन, कवी ना. धों. महानोर, डॉ. आप्पासाहेब पवार, इस्राईलचे कृषीमंत्री याकोब सूर, महाराष्ट्राचे कृषीमंत्री हर्षवर्धन देशमुख, अरुणभाई गुजराथी व इतर मान्यवर.

शेतकरी मित्रांनो, सगळ्या देशांमध्ये मी जाऊन आलो. आगगाडी, बसमध्ये सार्वजनिक ठिकाणी गेलो. तर तेथे राजकारणाची चर्चा कुणीच करीत नाही. ते व्यवसाय, संस्कृती किंवा आपल्याबद्दल बोलतील, विचारपूस करतील. परंतु राजकारणाबद्दल कुणीही बोलत नाहीत. पाच वर्षांनंतर निवडणुका येतात. त्याची खूप जोरात चर्चा सुरू असते. पाच वर्षांनंतर तेवढ्या महिन्यापुरतीच तेथे चर्चा होते. आपल्याकडे पाहिले तर अगदी याच्या विरुद्ध चित्र दिसते. अमेरिका किंवा प्रगत देशात २ टक्के जनता ९८ टक्के जनतेचे पोट भरण्याचे काम करतात. इतकेच नव्हे, तर ९८ टक्के जनतेचे पोट भरेल इतके धान्य उत्पादन करुन निर्यात करतात. आपण ७४ टक्के लोक शेती व्यवसायाशी निगडित आहोत पोटापुरते धान्य आपण पिकवतो. शेतीपेक्षा आपण इतर विषयांवर जास्त लक्ष घालतो, विशेषत: राजकारण! विदर्भाचे जर बघितले तर उठता बसता ते राजकारणच करतात. मराठवाड्यात थोडे कमी प्रमाण आहे. पश्चिम महाराष्ट्राचा विचार करता, ते राज्यकर्ते आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनाचा तो अविभाज्य घटक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ही परिस्थिती बदलत आहे. ही फार चांगली बाब आहे. सुरेशदादांनी 'डंकेल प्रस्ताव म्हणजे काय?' याबद्दल मला जे काही माहिती आहे, त्याबद्दल साधक-बाधक चर्चा करायला सांगितले. त्यानुसार मी येथे बोलायला उभा आहे.

'डंकेल प्रस्ताव' म्हणजे सर्व देशांनी मिळून आखलेला एक प्रस्ताव. योजनेचा मूळ उद्देश असा की, जे प्रगत राष्ट्र आहेत, त्यांच्याकडे सर्व सोयीसुविधा असल्याने उत्पादनक्षमता जास्त आहे. म्हणजे दर एकरी जास्तीत जास्त उत्पादन ते घेतात. जास्त उत्पादन असणाऱ्या प्रगत देशांनी त्यांच्या मालाची किंमत १० टक्क्यांनी वाढविले पाहिजे म्हणजे जगात जी इतर प्रगतीशील राष्ट्रे आहेत त्यांना वर यायला संधी मिळेल. उदाहरणार्थ अमेरिकेत ४५० रु. क्विंटल भावाने गहू असेल, तर त्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत १० टक्के वाढविलेल्या किंमतीत विकावा अशी अपेक्षा आहे. विकसित देशांमध्ये प्रयोगशाळेत जे शोध लागतात ते शोध शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे विकसित तंत्राच्या जोरावर त्यांचे दर हेक्टरी उत्पादन जास्त असते. दुर्दैवाची बाब अशी आहे की, प्रयोगशाळेतील संशोधन आपल्यापर्यंत पोहोचू शकलेले नाही. ते आपल्यापर्यंत पोहोचावे अशा योजनेची आखणी केली केली पाहिजे. विद्यापीठाने नवे संशोधन केले तर ते आपल्यापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी त्यांची नाही. आपल्या देशात कृषी विश्वविद्यापीठे आहेत. त्यांच्यात एक प्रकारची उदासीनता आहे. त्याबद्दल चर्चा केली असता स्पष्टपणे सांगू इच्छितो की त्यांचे उत्तर काय आहे, आम्ही शंभर किलो बी तयार केले होते, त्यापैकी १० टक्के विकले गेले आणि ९० टक्के फेकून दिले. मोठ्या प्रमाणावर बी उत्पादन करण्याची काही तरतूद नाही. मोठ्या प्रमाणावर बी ते पुरवू शकत नाहीत अशी परिस्थिती आहे.

# सेवा देण्याची भावना फक्त जैन ग्रुपमध्येच

## बारामती कृषीविकास प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष डॉ. आप्पासाहेब पवार यांचे गौरवोद्‌गार

''ग्राहकाच्या हिताचा विचार करून माल विकल्यानंतर सेवा देण्याची भावना फक्त जैन ग्रुपमध्येच आहे'' असा आवर्जून उल्लेख करुन बारामती कृषि विकास प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष डॉ. आप्पासाहेब पवार आपल्या भाषणात म्हणाले, की कृषि विद्यापीठातले तज्ज्ञ शेतकऱ्यांच्या शेतावर जात नाहीत. ही दरी ज्या दिवशी कमी होईल तेव्हा शेतकरी भाग्यवान ठरेल. जैन उद्योग समुहाने इस्त्राईलचे तंत्रज्ञान सर्वप्रथम भारतात आणून ही दरी कमी करण्याचे महान काम केले आहे. याबद्दल भवरलालजींना धन्यवाद तर दिलेच पाहिजेत पण शेतकऱ्यांनी जैन ग्रुपचे ऋणही मानले पाहिजे. ज्या ग्राहकासाठी आपण काम करतो तो संपन्न झाला पाहिजे असा उदार व उदात्त दृष्टीकोन मानवतावादी भूमिकेतून बाळगणारा भवरलालजींसारखा उद्योगपती विरळा आहे, या शब्दांत आप्पासाहेबांनी भाऊंचा गौरव केला.



याच भाषणात आप्पासाहेब पवार पुढे म्हणाले, ''१९६९ साली म्हणजे २४ वर्षांपूर्वी मी इस्त्राईल आणि जपान या देशांना जाऊन तिथल्या शेतीचा अभ्यास केला. जगातले उत्पादनाचे सर्व उच्चांक इस्त्राईलने मोडले. वर्षाला ९ हजार लिटर दूध देणारी गाय मी तिथे पाहिली. वर्षाला ३०० अंडी देणारी कोंबडी मी पाहिली. आणि रोज ५ लिटर दूध देणारी शेळीही मी पाहिली. रेताड, वाळवंटी आणि ४ इंच पाऊस पडणाऱ्या देशात जर ही उत्पादकता असेल तर आपली उत्पादकता याच्यापेक्षा अधिक असली पाहिजे असा विचार आपण का करीत नाही? लोकसंख्या वाढ, बेकारी यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन आपले राज्यकर्ते रामरहीम, नामांतर असल्या अनुत्पादक विषयांमध्ये गुंतले आहेत. मग त्यांना शेती व शेतकऱ्यांच्या कल्याणाचे प्रश्न कसे दिसतील?

''मला शेती क्षेत्रात काम करण्याच्या सगळ्या प्रेरणा इस्त्राईलमुळे मिळाल्या. तंत्रज्ञानही त्यांनीच दिले. त्यामुळे २४ वर्षे ज्या गोष्टींचा ध्यास मी घेतला होता तो आज भवरलालजींमुळे पूर्ण होतो आहे ही माझ्या आयुष्यातली मोठी समाधानाची गोष्ट आहे,'' असाही उल्लेख आप्पासाहेबांनी आवर्जून भाषणात केला.

# ।। भवरजी, तुम्ही निर्मिले पाणी ।।

मूर्त जाहली इथे विराणी
आज ही स्वप्नातली कहाणी
भगीरथाचा पुत्र होउनि
तुम्ही निर्मिले पाणी।।१।।

उजाड डोंगर, खडकमाळ हा
जेव्हा पाहिला तुम्ही
हुरहुरले काळीज कराया
नंदनवन या स्थानी
स्वहस्ते वेचूनि दगड ते
अर्ध्य दिले घामानी
तुम्ही आणिले पाणी।।२।।

वृक्षांच्या रोमांचे हिरव्या
सजले डोंगर इथले
आम्र, सीताफळ, पेरूंनी
हा आसमंत डोले
ठायी ठायी वन दाट जाहले
मोर नाचती हर्षे
आनंदाने पक्षी गाती,
सुस्वर जीवनगाणी
कारण तुम्ही राखले पाणी।।३।।

तळ्या तळ्यांच्या बिलोरी आयनी
रूप पाही घनराई
अगा नवल हे कसे घडले?
चकित होती पशु गाई
मेघ थबकुनि जाती बरसुनि
मानवंदना देवोनि
तुम्ही अडविले पाणी।।४।।

बळीराजाच्या उद्धारास्तव
पाझर तुमच्या मनी
इथे सर्व साम्राज्य उभविले
कृषिस्तव ध्येयासाठी
रात्रंदिन तो ध्यास जीवाला
त्यातून ही अमर कहाणी
तुम्ही निर्मिले पाणी।।५।।

सोन्याचे हे हात तुमचे
सोने केले दगड मातीचेही
पुरूषार्थाची गाथा आणि
कथा उज्ज्वल ध्येयाची
दृष्टी जोखते भविष्याला
वर्तमान तेजस्वी घडविला

या मातीच्या कणाकणावर
पत्थर आणि या काळावर
कर्तृत्वाची तुम्ही कोरली,
अमीट, मनोहर लेणी
तुम्ही जमवूनि पाणी।।६।।

नकोच आता ताज आम्हाला
नको नवी मंदिरे
हवीत अशी राष्ट्रासाठी
आधुनिक तीर्थक्षेत्रे
जैन हिल, व्हॅली, गुरूकुले
तुम्ही उभविली जनहिते
पाणी पाणी करणाऱ्यांना
दिलेत पाऊस पाणी
भवरजी, तुम्ही निर्मिले पाणी।।७।।

**सौ. सुरेखा शहा, सोलापूर**



## कृषिभक्ती भाऊंची

जन्मतःच लाभली ही
दर्दम्य इच्छाशक्ती।
हृदयात प्रगटली
शेतीवरती भक्ती ।।१।।

कर्मयोग्याचा हात फिरता
डोंगरमाथा हसला।
निष्ठेचा हा घाम गाळूनी
माळरान फुलला ।।२।।

शेतीवरती मन जडले
नंदनवन ते झाले।
देशविदेशात आपुले
नावरूपाला आले ।।३।।

जलदेवता प्रसन्न करुनी
अभिषेक केला।
वनराईच्या आनंदाला
कसा बहर आला ।।४।।

शेती माउलीचे वैभव
पाहून मन थक्क होते।
कर्मयोग्याचे कर्म पाहूनी
नतमस्तक होते ।।५।।

शेती माउलीचे आशीर्वाद
हे वरदान झाले।
मोठे भाऊ यामुळे
'कृषिभक्त' झाले ।।६।।

**– चिमणबापू ठाकरे**

## होऊ उद्योगी

भूमिपुत्राला अधिकाराने, सांगती भाऊ।
हट्ट नको नोकरीचा, शेती उद्योगी होऊ।।

संत भूमी आपली, उद्योगी खाण होऊ दे।
'ठेविले अनंते...', या उक्तीला बाद होऊ दे।।

तंत्र कौशल्याचे गिरवू, घडे आम्ही नवे।
या मातीतून घडवू, पर्व अनोखे नवे।।


सत्य, श्रमेचे तर आम्ही, होऊ खरे पुजारी।
उद्योग व्यवसायाची, नीती शिकू या खरी।।

कर्म-धर्म-मर्म ओळखू, होऊ आम्ही उद्योगी।
या भूमीतच होऊ आम्ही, मोठे आणि त्यागी।।

ठेवू ध्येय मनी, पराकाष्ठेची कास धरू।
नित्य दिनाने, सृजनतेचाही ध्यास धरु।।

**– सुभाष पवार**






## गाणे थेंबभर

आम्ही या खेड्यात जन्मलो, दु:खांची गाथा
या खेड्याचे पांग फेडण्या उन्नत हा माथा ।।१।।

दु:ख, दैन्य अन् दारिद्र्यातील शेतकरी माझा
जुन्या पुराण्या शेतीमधला रुतलेला फासा ।।२।।

आम्ही सोडवू फासा रुजवून थेंबाचे पाणी
थेंबाचे पाणी नवे आकाश पांघरोनी ।।३।।

दांडांच्या गवतात हरवले शेताचे पाणी
अमुचे पाईप घेऊन आले गंगेचे पाणी ।।४।।

फुलाफळांनी सजली सृष्टी लदबदले संसार
लदबदले संसार सुखाच्या वाटा दर्यापार ।।५।।

ऊती संवर्धन, जल संवर्धन डोंगर माळांनी
बहरुन गातील शेतकरी या नवतेची गाणी ।।६।।

पिवळी केळी सातपुड्याची सात समुद्रापार
कष्टकऱ्यांच्या घरट्यावरती सोन्याचं कौलार ।।७।।

इथे उभारु कॅलिफोर्निया, इस्राइल अवघा
नवे तंत्र अन् शास्त्र आमुच्या हातांचे आता ।।८।।

कला संस्कृती इथे नांदती अमुच्या सांगाती
संपत्तीला विसरुन बांधूजन्माची नाती ।।९।।

आम्ही ह्या खेड्यात जन्मलो, दु:खाची गाथा
ह्या गरिबांचे पांग फेडण्या उन्नत हा माथा
ह्या खेड्याचे पांग फेडण्या उन्नत हा माथा ।।१०।।

**– ना.धों. महानोर**


जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®
www.jains.com

जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ६, पो.बॉ. ७२, जळगांव-४२५००१. (महाराष्ट्र.)
**दूरध्वनी:** ०२५७-२२५८०११; **ई-मेल:** krushitirth@jains.com; संकेतस्थळ: www.jains.com

**मुद्रक, प्रकाशक मनिष अमृतलाल शहा** यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/ए, एन. एच. क्र.६, मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे.
**संपादक: डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे**; वर्ष: २; अंक: ९ (डिसेंबर २०२०/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही)

Post Regn. No.: JAL/417/2019-2021 Published on 19th of every month, posted on 20th of every month at Jalgaon-425001
**RNI NO. MAHMAR/2018/76944**